RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)      कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर    वर्ष ३४ वे    अंक १६० वा  शुक्रवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक)   पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26   पृष्ठे – ६   मो:९४२२४७२५०२   किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

संपर्क

जडे ऑफसेट प्रिंटर्स

मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८



# दिल्ली हायकोर्टपाठोपाठ मुंबई हायकोर्टाला ईमेलद्वारे बॉम्बने उडवण्याची धमकी

**मुंबई/प्रतिनिधी: मुंबई हायकोर्टाला शुक्रवारी दुपारी बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. त्यामुळे मुंबई हायकोर्ट रिकामे करण्यात आले असून तापसणी सुरु आहे. बॉम्बशोधक पथक आणि पोलिसांचे पथक हायकोर्टात तातडीने दाखल झाले आहे. हायकोर्टातील वकील, न्यायाधीशांचे सर्व चेंबर खबरदारी म्हणून तपासणीच्या कारणास्तव रिकामे करण्यात आले आहेत. हायकोर्टातील रजिस्टर ऑफिसमध्ये मेलद्वारे ही धमकी देण्यात आली होती.**

मुंबई हायकोर्टासोबतच दिल्ली हायकोर्ट बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. त्यामुळे दोन्ही हायकोर्ट खाली करण्यात आले आहेत. शुक्रवारी दुपारी बॉम्ब स्फोट होणार असल्याचे मेलमध्ये म्हटले आहे.

हायकोर्टातील रजिस्टर ऑफिसमध्ये मेलद्वारे ही धमकी देण्यात आली आहे. या मेलमध्ये 'बॉम्ब स्फोटांसाटी शुक्रवार पवित्र, त्यासाठी पाकिस्तान-तामिळनाडू यांची मिलीभगत जज रुम, कोर्ट परिसरात तीन बॉम्ब ठेवण्यात आले आहेत. दुपारी २ वाजेपर्यंत खाली करा' असे म्हटले होते.

मुंबई हायकोर्टातून सर्व न्यायाधीश आणि कोर्ट स्टाफ यांना बाहेर जाण्यास सांगण्यात आले आहे. हायकोर्टाची संपूर्ण इमारत खाली करण्यात आली आहे. बॉम्ब स्कॉड पथकही दाखल झाले आहे. पोलीस सर्व माहिती घेत आहेत. ज्यावेळी धमकी मिळाली तेव्हा पोलीसांनी सर्व कोर्ट रूममध्ये स्टे अलर्टचा मेसेज दिला. त्या नंतर सर्व इमारत खाली करण्यास सुरवात केली.

नुकताच स्पेशल सेलने देशभरातून पाच संशयित दहशतवाद्यांना अटक केली. बुधवारी आणि गुरुवारी, सलग दोन दिवसांच्या कारवाईनंतर या पाच जणांना अटक करण्याता आली होती. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटकेही जप्त करण्यात आली होती. त्यामुळे, या घटनेचा आणि अटक केलेल्या दहशतवाद्यांचा काही संबंध आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे पोलीस तपास करत आहेत. तसेच या ई-मेलनंतर मुंबई शहराच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.





हे छायाचित्र मुंबई उच्च न्यायालयाचे आहे. येथे न्यायाधीश, वकील आणि न्यायालयाच्या आवारात उपस्थित असलेल्या सर्व लोकांना बाहेर काढण्यात आले.



हे छायाचित्र दिल्ली उच्च न्यायालयाचे आहे. बॉम्बच्या धमकीनंतर न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला. वकील आणि इतर बाहेर उभे होते.

## नेपाळसारखे अराजक; भारतात घडवण्याचा डाव: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आरोप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : नेपाळमधील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. काही लोकांच्या मनात भारतात नेपाळसारखे अराजक घडवण्याचा डाव आहे. त्यामुळे अशा लोकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी येथे पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांच्या शपथविधीच्या निमित्ताने दिल्लीच्या दौऱ्यावर होते. तिथे शपथविधीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी वरील विधान केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भारतात नेपाळसारखी परिस्थिती उद्भवण्याचा इशारा दिला होता. पत्रकारांनी याविषयी प्रश्न करताच शिंदे यांनी चटकन भारतात असे काहीही शक्य नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, अशा प्रकारचे वक्तव्य करणे फार दुर्दैवी आहे. प्रत्येकाला देशाप्रती स्वाभिमान, अभिमान असला पाहिजे. देशभक्त व देशावर प्रेम करणारे लोक अशा प्रकारचे विधान करू शकत नाहीत. काही लोकांच्या मनात नेपाळसारखे अराजक किंवा तशा प्रकारची परिस्थिती निर्माण करण्याचा डाव असू शकतो. त्यामुळे तसे कारस्थान कुणी रचत नाही ना? असा प्रश्न उभा राहत आहे.

भारतीय लोकशाही पद्धती अत्यंत प्रगल्भ आहे. अतिशय मजबूत आहे. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाचे संविधान लिहिले. त्यामुळे भारतात अशा प्रकारची दुर्दैवी घटना कधीही होणे शक्य नाही. काही लोक आपल्या मनातील भावना बोलून दाखवण्याचे काम करत आहेत. कारण, लोकशाहीमध्ये त्यांना जनतेच्या मतांमधून निवडून येता येत नाही. त्यामुळे त्यांची अशा प्रकारचा प्रयत्न करून पाहण्याची इच्छा आहे का? हा देखील विचार करण्याची आवश्यक्ता आहे. त्यामुळे देशामध्ये अराजक पसरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर कठोर कारवाई झाली पाहिजे. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे, असे शिंदे म्हणाले.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, आजचा दिवस एनडीएसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी पी राधाकृष्णन यांचा निवडणुकीत प्रचंड बहुमताने विजय झाला. आज त्यांचा अत्यंत दिमाखदार शपथविधी झाला. या शपथविधीला आम्हाला उपस्थित राहता आले. मी याविषयी राधाकृष्णन यांचे अभिनंदन करतो. त्यांना खूप खूप शुभेच्छा देतो. ते एवढ्या मोठ्या पदावर गेले. पण ते अतिशय साधी राहणी, मनमिळवू स्वभाव, उच्च विचारसरणी असे बहुआयामी नेतृत्व म्हणून उपराष्ट्रपतीपदावर सी पी राधाकृष्णन विराजमान झाले. त्यांना राज्यपाल व संसदीय कामकाजाचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने या पदावर राहून या पदाची शान, मान व सन्मान वाढवतील याचा आम्हाला अभिमान आहे.

शिंदे म्हणाले, आजच्या शपथविधीला उपमुख्यमंत्री अजित पवार अनुपस्थित होते. पत्रकारांनी याविषयी शिंदे यांना छेडले असता त्यांनी अजित पवार यांच्या पक्षाकडून प्रफुल्ल पटेल या समारंभाला उपस्थित होते. त्यामुळे एनडीएचे सर्व लोक या कार्यक्रमाला उपस्थित होते, असे ते म्हणाले. पत्रकारांनी त्यांना पुन्हा अजित पवारांना एनडीएमध्ये करमत नाही का? असा उलटप्रश्न केला.

## गोंदियाचे पालकमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्याकडून विकास कामाचा आढावा



**गोंदिया/प्रतिनिधी** : राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील हे गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून नगरपरिषद व अल्पसंख्यांक विभागाच्या विविध कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांची कामे, नगरपरिषद पातळीवर नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा, अल्पसंख्यांक समाजासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीची गती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या दैनंदिन गरजा, शहरांचा सर्वांगीण विकास, प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ आणि अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ठोस उपाययोजना या सर्व बाबींवर चिंतन करत पुढील कार्ययोजना ठरविण्यात आली. या बैठकीला माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाधिकारी प्रजीत नायर, सीईओ मुकगाथानम, डीपीओ सुनील घोंगडे, श्रीमती चानपुरकर मॅडम, संदीप बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुलाच्या तोंडावरून हात फिरवला, भुजबळांचे डोळे पाणावले

## लातूरमध्ये भरत कराड यांच्या कुटुंबाला भेटल्यानंतर सरकारला केले मोठे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** मंत्री छगन भुजबळ यांच्यातील आजोबाचे दर्शनही उभ्या महाराष्ट्राला घडले. मंत्र्यांच्या आडून दबलेला एक सामाजिक नेता, संवेदनशील नेता अश्रूंचा बांध तोडताना राज्याने पाहिले. एरव्ही करारी वाणी, पल्लेदार संवाद आणि बेधडक भाषणासाठी भुजबळ ओळखले जातात. शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा, रांगडा शिवसैनिक आणि ओबीसींची बुलंद तोफ अशी काही भुजबळांची देहबोली आहे. 'हम जहाँ से खडे.., तिथूनच सभेला सुरुवात' असे भुजबळांचे व्यक्तिमत्व. पण लातुर येथे भरत कराड यांच्या कुटुंबाला भेट देताना आणि त्यांच्या मुलांना मांडीवर घेताना भुजबळांना एकाएक गलबलून आले. त्यांच्या हृदयाला कोण पाझर फुटला. देह थरथरला. घरातील स्त्रीया रडू लागल्या, मुले कावरीबावरी झाली आणि भुजबळांनी त्यांना जवळ धरले. त्यावेळी त्यांनाही रडू अनावर झाले. आपल्या रुमालाने त्यांनी मुलांचे डोळे पुसले. ओबीसी लढ्यात आज राग नव्हता. तर हळहळ होती. ओबीसी आरक्षण बचाव लढ्यात आजच्या चित्राने भुजबळ भावनिक झाले. त्यांनी सरकारला मोठं आवाहन केलं.



ओबीसी आरक्षणाचा लढा आता अधिक तीव्र होताना दिसत आहे. ओबीसी नेते मराठा आरक्षण जीआरवरून संतापले आहेत. त्यात मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारवर विश्वासात न घेतल्याचा आरोप केला आहे.

त्यांनी आज मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर नाव न घेता सडकून टीका केलीच, पण त्याचवेळी मराठा समाजातील धुरणीने आरक्षणावर बोलते होण्याची गरज व्यक्त केली. तर आज त्यांनी लातूर येथे जाऊन भरत कराड यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



आचार्य देवव्रत राज्याचे प्रभारी राज्यपाल...

## चिमटा दयाचा



लातूर महानगरपालिकेच्या आयुक्तांचे होत आहे अभिनंदन ! अशीच सध्याची कारवाई सतत चालू ठेवून लातूरचे व्हावे नंदनवन !!

# लातूर शहरातील प्रभाग क्र. ३ मधील सर्वे नं. ९५ मधील लोकांना कबाला देवून प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ देण्याची मागणी

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्र. ३ मधील सर्वे नं. ९५ येथील लोकांना कबाला नसल्यामुळे ते लोक प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ त्यांना लाभ घेता येत नाही यासाठी राष्ट्रवादी किसान सभेच्यावतीने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालय (महसुल विभाग) व आयुक्त महानगरपालिका यांना निवेदन देण्यात आले.

इंदिरानगर, साठेनगर, जयभीमनगर, बालाजीनगर, आनंदनगर भागातील राहणारे ओबीसी रहिवासी गेली ४० वर्षे येथे राहतात. यामध्ये बहुसंख्य दलित, मुस्लिम, ओ. बी. सी. मध्ये भोई, धनगर, कुंभार, गुरव व मुस्लिममधील ओबीसी जसे की आत्तार, तांबोळी, मणियार, पटवेकर व इतर ओबीसी समाजातील लोक राहतात. प्रभाग क्र. ३ सर्वे नं. ९५ हे गायरान असल्यामुळे येथील काही लोकांनी गृह निर्माण सोसायटी



करून घेतली आहे; पण ज्यांची या गृह निर्माण सोसायटीमध्ये नावे नाहीत असे लोक यापासून वंचित राहात आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेच्या अटींप्रमाणे आवश्यक कागदपत्रांमध्ये एक तर जागेची रजिस्ट्री किंवा जागेचा कबाला द्यावा लागतो; पण हे गायरान असल्यामुळे तेथील रजिस्ट्रीही होत नाही व लातूर शहर महापालिकेने यांना आतापर्यंत कबालाही दिला नाही. यामुळे येथील भोई, धनगर, कुंभार, गुरव व मुस्लिममधील ओबीसी बाधवांना यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पक्की घरे मिळावी यासाठी राष्ट्रवादी किसान सभेच्यावतीने लातूर शहर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर राहुल बनसोडे, प्रणिती सुर्यवंशी, संतोष उपाडे, दिनेश कांबळे, जाहगिर शेख, सुनेद पठाण, परमेश्वर पर्वते, सोहम गायकवाड, ॲड. राजेश खटके, रमाकांत कसबे, गणेश कांबळे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत लातूरचा मल्हार माने सुवर्णपदक विजेता



**लातूर/प्रतिनिधी:** तामिळनाडू राज्यातील चेन्नई येथील नेहरू इंडोर स्टेडियममध्ये २७ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान पार पडलेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग चिल्ड्रन अँड कॅडेट चॅम्पियनशिप स्पर्धेत लातूरचा खेळाडू मल्हार बालाजी माने (वय ८ वर्षे) याने आपल्या दमदार खेळीसह महाराष्ट्राचा झेंडा उंचावत सुवर्णपदकाची कमाई केली.

लातूर येथील इन्व्हिन्सिबल मार्शल आर्टस् चा विद्यार्थी असलेल्या मल्हार मानेने १८ किलो वजनी गटातील लाईट कॉन्टॅक्ट प्रकारात सुवर्ण पदक जिंकले. या यशामुळे लातूर जिल्ह्याचा तसेच महाराष्ट्र राज्याचा नावलौकिक देशभर गाजला.

या कामगिरीमागे मुख्य प्रशिक्षक शुभम सोनवणे (लातूर जिल्हा किकबॉक्सिंग एसोसिएशन उपाध्यक्ष) व सहायक प्रशिक्षक शेख अली यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच लातूर किकबॉक्सिंग असोसिएशनचे सचिव वासिम सय्यद सर यांचे विशेष सहकार्य लाभले. दरम्यान, या स्पर्धेत महाराष्ट्राने एकूण ४८ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ६७ कांस्य अशी १५४ पदके जिंकून देशात प्रथम क्रमांक पटकावला.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजकिय वातावरण बिघडत आहे?

महाराष्ट्रात राजकिय वातावरण बिघडत व दुषीत होत आहे की काय असे वाटायाला लागले आहे. मुंबईत मराठा आंदोलन झाले. ओबीसी यांचेही वक्तव्य येत आहे. ओबीसीतून आरक्षण हवे आहे असे विचार मराठ्यांचे आहे तर आम्ही ओबीसीतून देवू देणार नाही असे ओबीसीचे नेते मंडळींचा सुर आहे. त्यामुळे एक आवघड समस्या आहे, तरी यातून मार्ग निघेल अशी आशा आहे. आगामी राज्यात सर्वात मोठी आर्थिकसंपन्न असणारी मुंबई महानगर पालिकेची निवडणुक होणार आहे. ती भाजपाला आपल्या ताब्यात आणण्याचा विचार आहे त्या दृष्टिने प्रयत्न केले जात आहेत. राज्यात आगामी काळात अनेक महानगरपालिका व जिल्हापरिषदेच्या निवडणुका होणार आहेत. त्यात ही महायुतीचा झेंडा फडकावयाचा आहे. एकंदरीत राजकारण हे सत्तेसाठी आलिकडील काळात दिसून येत आहे. त्यात दोघा ठाकरे बंधुंना म्हणावे तसे राज्यात यश मिळत नाही हे ओळखुन की काय एकत्र येण्याच्या दृष्टिने पावले पडत आहे. राज ठाकरे यांना जो राजकिय त्रास झाला तो उद्धव ठाकरे यांच्या वागण्यामुळे झाला हे सर्वजन जानतात. त्याच प्रमाणे राज ठाकरे यांचे सर्वांशी संबंध मैत्रीचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत किंवा केंद्रिय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस किंवा एकनाथ शिंदे यांच्यासोबत असोत सर्वांचे समसमान प्रेमभावनेचे संबंध राज यांनी टिकविले आहेत. तसे उद्धव ठाकरे यांचे नाही. त्यांनी सोनिया गांधी यांच्या काँग्रेस पक्षा बरोबरच काय तसेच शरद पवार यांच्यासोबत जाऊन मुख्यमंत्र्याची माळ गळ्यात पाडून घेतली. वास्तविक उद्धव ठाकरे हे मोठे नेते आहेत. ते किंग्जमेकर आहेत, किंग्ज नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. उद्धव ठाकरे सारखे राज ठाकरे यांना करण्यात वेळ लागणार नाही ते मुख्यमंत्रीच काय इतर पद सहज हस्तगत करू शकतात, त्यांचा सत्ताधारी विचार करूही शकतात. असो, आता उद्धवजींना इतरांचे दरवाजे बंद झाल्यासारखे आहेत. शरद पवार असोत किंवा काँग्रेस यांचे असित्व किती आहे! पुर्वी सारखे पुन्हा राज ठाकरे यांना वागणक मिळाली तर? पुर्वीचे सर्व विसरून राज यांच्याकडे उद्धवजींची जवळीकता वाढवत आहेत. हे जरी सत्य असले तरी या बाबत संभ्रमच आहे. स्पष्टता बाहेर आली नाही. त्यामुळे संजयजी जे बोलतात यावर जनतेचा फारसा विश्वास बसत नाही. दोन्ही ठाकरे पैकी एकाने तरी काय ते बोलले पाहिजे. मुळात सध्याला उद्धवजी पेक्षा राज ठाकरे यांचे वजन अधिक आहे. सत्तेसाठी त्यांनी कोणतीही ॲडजेस्टमेंट करू शकते. उलट मुंबईत राज ठाकरे हे भाजपासोबत गेले तर मनसेचा फायदा होणार आहे. मुंबईत राज ठाकरे यांना मानणारा वर्ग आहे. उद्धवजींनी केवळ सर्वांपासून दूर राहील्याचा परिणाम दिसून येऊ शकतो. राज्यात आलिकडे कामा पेक्षा सर्वच चर्चाच दिसून येत आहे. मराठा आंदोलन, ओबीसी कार्यकर्ते एकवटले आहेत. हैद्राबाद गॅजेटवरून कोळी समाज व बंजारा समाज जागा झाला आहे. आरक्षण जातीवरून दिले गेले आहे. वास्तविक आर्थिकदृष्ट्याबाबीवरून आरक्षण नाही. वास्तविक ज्यावेळी आरक्षणामुद्दा पेटला त्यावेळी दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे, विलासरावजी देशमुख व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी या बाबत स्पष्ट भुमिका व्यक्त केली होती. त्यांना आरक्षण दिले तर आम्ही घेणार नाही असे जाहिर मुंडे व देशमुख यांनी म्हटले होते. आर्थिक निकषावर मिळावे असे स्पष्ट विचार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचेही होते. वास्तविक ही संकल्पना एका विशिष्ठ विचारातून पुढे आली. त्याला विराम न देता राजकिय मतासाठी चालू ठेवली याचा परिणाम दिवसेंनदिवस वाढत गेला. त्यामुळे आज जे आरक्षणाबाबत वातावरण गरम होत आहे या बाबत कोण्याएकाला दोष देणे योग्य नाही. याबाबत सर्वांनी एकविचार घेवून नवीन नियम ठरविण्याची गरज आहे. जसे गोपीनाथ मुंडे व विलासराव देशमुख यांनी आम्ही किंवा आमचे कुटुंबिय आरक्षणाचा लाभ घेणार नाही असे जाहिर सांगितले. काही या बाबत नारायण राणे यांचे वक्तव्य विचार करायाला लावणारे आहे. या आरक्षणामुळे राज्यात महत्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. पावसाने शेतकऱ्याची आर्थिक आवस्था बिकट झाली आहे. त्यांना मदतीची मोठी गरज आहे. सर्वजनच जर आरक्षणाच्यामुद्दयावर टेंशन घेत असतील तर शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होणार तर काय होणार? त्यामुळे मुळ महत्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे हे मान्यच केले पाहिजे. राज्यात दिवसेंन दिवस नवा वादग्रस्त मुद्दा निर्माण होत आहे. असे मुद्दे निर्माण होत आहेत की, जे सहज मिटतील असे नाहीत. संवेदनशील असे मुद्दे आहेत. या बाबत मत मांडणे किंवा सुझाव देणे म्हणजे अंगावर घेण्यासारखे वाटत आहे. त्यामुळे अनेकजन गप्प दिसून येतात. कोणी स्पष्ट मत मांडत नाहीत. नेतेच मत व्यक्त करीत आहेत. जो-तो सावध भुमिकेने चालत असेल तर प्रश्नाची उकल कशी होणार? मुळात राज्यात काही मुद्दयावरून जे कामे अपेक्षित आहेत ते दुर्लक्षित होत आहेत. सणासुधीचे दिवस जवळ आले आहेत. शेतकऱ्यांना मदतीची गरज आहे. पावसामुळे रस्ते व पुल वाहून गेले आहेत. काही शाळा आदि ईमारतीची पडझड झाली आहे. त्याकडे अजूनतरी लक्ष गेले नाही. ते कधी पुर्ववत करणार? त्यामुळे किचकट प्रश्नामुळे महत्वाच्याबाबीकडे दुर्लक्ष होत आहे हे मान्यच केले पाहिजे. त्यासाठी सरकारला सुद्धा नाजुक प्रश्न हाताळणे आवघड दिसून येत आहे. 'धरलं तर चावते व सोडले तर पळते' अशी स्थिती निर्माण झाल्याचे जाणवत आहे. त्यामुळे कोणत्याही समाजाला नाराज करणे परवडणारे नाही हे ओळखून वाटचाल सुरु असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. त्यामुळे काही बाबीत नेते, कार्यकर्ते व नामावंत पुढाऱ्यांनी लक्ष घालुन प्रश्न मार्गी लावले पाहिजेत. सरकार म्हणाल तर संवेदनबाबीला हात घालेल असे वाटत नाही. त्यामुळे राज्यात नको त्या प्रश्नामुळे राजकिय वातावरण बिघडत आहे हे मान्यच केले पाहिजे. यातून नेतेमंडळी कसा मार्ग काढतील हेच पाहाणे बाकी दिसून येत आहे.

# वीज क्षेत्रातील कामगिरीत महावितरणचा प्रथम क्रमांक केंद्र सरकारच्या मानांकनात यश, १०० पैकी ९३ गुण




**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये शंभरपैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक मिळविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या कामगिरीमुळे कंपनीला यश मिळाले आहे. या यशाबद्दल आपण मा. मुख्यमंत्र्याचे आभार मानतो तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो, असे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

महावितरणच्या कामगिरीत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले, असे ते म्हणाले. ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आरईसी व पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी वीज कंपन्यांचे मानांकन निश्चित केले. पश्चिम भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण १०० पैकी ९३ गुणांसह महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे व राज्याला ए मानांकन मिळाले आहे. महाराष्ट्राच्या पाठोपाठ मध्य प्रदेश (८४.५ गुण), गोवा (७४ गुण), दादरा, नगर हवेली आणि दीव दमण (७४ गुण), गुजरात (६७ गुण) व छत्तीसगड (५२ गुण) यांचा क्रमांक लागतो.

मानांकन निश्चित करण्यासाठी पाच निकष ठरविण्यात आले होते. त्यापैकी संसाधन पर्याप्तता (३२ पैकी ३२ गुण), ऊर्जा परिवर्तन (१५ पैकी १५ गुण) व नियामकाच्या अनुषंगाने प्रशासन (५ पैकी ५) या तीन घटकात महावितरणला पैकीच्या पैकी गुण मिळाले. वीज कंपनीचे आर्थिक स्थैर्य या घटकात २५ पैकी २४ गुण मिळाले. जीवन सुलभता व व्यवसाय सुलभता या निकषात महावितरणला २३ पैकी १७ गुण मिळाले. या निकषात गुजरातला १४ तर मध्य प्रदेशला १६ गुण मिळाले. वीज क्षेत्रातील कामगिरीबद्दल गुणांकनाची प्रक्रिया ३ मार्च रोजी सुरू झाली होती. देशातील मानांकनामध्ये ८५ पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या राज्यांचा ए गटात समावेश केला असून त्यामध्ये महाराष्ट्रासह एकूण ८ राज्ये आहेत.

महावितरणच्या यशाचे कारण

महावितरणने गेल्या तीन वर्षात ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी तसेच भविष्यकाळाचा वेध घेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली. त्यामुळे मानांकन उंचावले आहे.

आगामी काळात राज्याची विजेची मागणी किती असेल याचा अभ्यास करून महावितरणने ऊर्जा विभागाच्या मदतीने आराखडा तयार केला. अशा प्रकारे ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

ऊर्जा परिवर्तन आराखड्यानुसार महावितरणने गेल्या अडीच वर्षात ४५,००० मेगावॅट वीज खरेदीसाठीचे करार केले व आगामी पाच वर्षांची तरतूद केली. या वीज खरेदी करारांमध्ये नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षात वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असून त्याच्या आधारे महावितरणच्या वीजदरात पाच वर्षांसाठी सर्वच ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा १६ हजार मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प महावितरणच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. राज्याच्या ऊर्जा परिवर्तनासाठी हा महत्त्वाचा गेम चेंजर प्रकल्प आहे. शेतांमध्ये सौर पंप बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. वीज पुरवठ्याचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी महावितरणतर्फे आरडीएसएस योजनेच्या अंतर्गत पायाभूत सुविधांचे काम प्रभावीपणे चालू आहे. या सर्वांचा विशेषतः वीजदराच्या कपातीत मिळालेल्या यशाचा परिणाम म्हणून महावितरणला १०० पैकी ९३ गुण मिळाले असून प्रथम क्रमांक मिळाला आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना महाकुंभमेळा २०२५ मध्ये सेवेबद्दल सन्मानित

**सोलापूर/प्रतिनिधी :** जगातील सर्वात मोठ्या उत्सवांपैकी एक असलेल्या प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कर्मचाऱ्यांचा समर्पित सहभाग दिसून आला. भाविकांच्या प्रचंड गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी सोलापूरमधील १७ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची एक टीम १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत उत्तर मध्य रेल्वेच्या प्रयागराज विभागात तैनात करण्यात आली होती.

सोलापूरच्या या कर्मचाऱ्यांच्या टिमने केवळ प्रभावी गर्दी व्यवस्थापनातच नव्हे तर सुरळीत प्रवाशांच्या सुविधा सुनिश्चित करण्यातही योगदान दिले, जे भारतीय रेल्वे ज्या मानवी स्पर्शासाठी आणि वचनबद्धतेसाठी ओळखली जाते त्याचे प्रतिबिंब आहे. त्यांच्या अनुकरणीय प्रयत्नांची दखल घेत, प्रयागराज विभागाने त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल या पथकाचा सत्कार केला.




परतल्यानंतर, पथकाने सोलापूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील यांची भेट घेतली आणि महाकुंभ दरम्यान सेवा करतानाचे त्यांचे अनुभव सांगितले . श्री योगेश पाटील यांनी त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करताना म्हणाले की, ''महाकुंभातील आमच्या तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना मिळालेला अनुभव हा मध्य रेल्वेला महापरिनिर्वाण दिवस, आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी आणि सिंहस्त कुंभ यासारख्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या मेळाव्यांच्या रेल्वे नियोजनात खूप फायद्याचा ठरेल . त्यांचे योगदान भक्ती आणि श्रद्धेच्या क्षणांमध्ये समाजाची सेवा करण्याच्या रेल्वेच्या वचनबद्धतेचे साक्ष देते.''

सोलापूर विभागाला त्यांच्या कर्मचाऱ्यांचा अभिमान आहे, ज्यांच्या वचनबद्धतेमुळे मोठ्या मेळाव्यांमध्ये रेल्वे काळजी, सुरक्षितता आणि मानवतेच्या सेवेचे प्रतीक राहते.

# सोलापुरातील तरुणाई कला केंद्राच्या विळख्यात अडकली, टेंभुर्णी गोळीबारानंतर सोलापूर पोलिसांसमोर मोठे आव्हान

सोलापूर: कला केंद्राच्या नादात तरुणाई आपले जीवन उद्धवस्त करताना दिसू लागली आहे. नर्तकीसाठी सासुरे येथे आत्महत्या आणि आता टेंभुर्णी (ऊास्प्लीहग) येथील कला केंद्रावर गाणे लावण्यावरून तरुणांकडून झालेल्या गोळीबारानंतर पोलिसांसमोरील आव्हाने वाढणार आहेत. कला केंद्रातील एका नर्तिकेच्या (खरत्र खहीर ऊरहमी) वेडापायी गेवराई येथील एका तरुण सरपंचाने केलेल्या आत्महत्येचे प्रकरण गाजत असताना आता टेंभुर्णी जवळील वेणेगाव येथे केवळ बैठकीत गाणे लावण्यावरून वाद झाला आणि चक्क एका तरुणाने दुसऱ्या तरुणावर गोळीबार केला. या प्रकारानंतर करमाळ्याच्या डीवायएसपी अंजना कृष्णा यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पोलिसांना तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार या गोळीबार प्रकरणातील चारपैकी तीन तरुणांना पोलिसांनी अटक केली असली तरी अद्याप यातील एक तरुण आणि गुन्ह्यात वापरलेली पिस्तुल मिळवण्यात पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. या गुन्ह्यात वापरलेले पिस्तुल हा गावठी कट्टा असण्याचा संशय असून या कला केंद्रावर झालेल्या वादातील दोन्ही तरुणांचे गट हे पंढरपूर तालुक्यातील आहेत. वेणेगाव येथील जय मल्हार लोकनाट्य कला केंद्रावर देवा कोठावळे व त्याचे तीन मित्र गेले होते. याच ठिकाणी नंतर आलेल्या सुरज पवार व त्याच्या तीन मित्रांमध्ये गाणे लावण्यावरून वाद झाला.

# निराधार महिलांसाठी 'शक्ती सदन'चा आधार

महाराष्ट्र कल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जाते. महिला सक्षमीकरण, सबलीकरणात आपले राज्य देशात अव्वल आहे. महिलांना शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्रात शासनाने नेहमीच पुढाकार घेतला आहे. विकासाच्या मुख्य प्रवाहात महिला नेतृत्वक्षम व्हाव्यात यासाठी देखील विविध उपाययोजना राबविल्या जात आहे. या योजनांच्या माध्यमातून आपल्या राज्यातील महिलांचे शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे. महिला सक्षमीकरणाचा समृद्ध वारसा आपल्या राज्याला आहे. हा वारसा राज्य शासन पुढे नेत असून महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबवित आहे, त्यापैकी एक म्हणजे शक्ती सदन योजना आहे. या योजनेमुळे निराधार महिलांना राज्यशासनाने शक्ती सदनचा आधार दिला असल्याची भावना महिलांमध्ये आहे. या योजनेमुळे निराधार महिलांचे जीवन सुसह्य होण्यास मदत होत असून शासनाची ही योजना निराधारांचे जीवनमान उंचावत आहे.

शक्ती सदन योजना

राज्यातील निराधार, निराश्रित, नैसर्गिक आपत्तीत, कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय मदत, कायदेविषयक समुपदेशन हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन, समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी 'शक्ती सदन योजना' राबविण्यात येते. २८ जिल्ह्यातील ४३ संस्थामध्ये ६३०० महिलांची काळजी व संरक्षण शक्ती सदन मार्फत करण्यात येत आहे. तसेच लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या, अनैतिक व्यापारात अडकलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण देऊन पुनर्वसन महिला व बालविकास विभागामार्फत राज्यात केंद्र पुरस्कृत शक्ती सदन या योजनेच्या माध्यमातून करण्यात येते. शिवणकाम, ड्रेस डिझायनींग, टायपींग,एम एच सीआयटी कोर्स, नर्सींग






असे विविध व्यावसायिक शिक्षण दिले जाते तसेच उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन व मदत केली जाते. शक्ती सदनची मदत घेण्यासाठी वैयक्तिक महिला अथवा सामाजिक संस्थांना जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागात मार्गदर्शन करण्यात येते.

महिलांची सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी केंद्र शासनाकडून मिशन शक्ती हा एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत संबल व सामर्थ्य या दोन उप योजना राबविण्यात येतात. यापैकी सामर्थ्य उपयोजनेंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येत असून या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

विधवा महिला, कुटुंबाने दुर्लक्षित केलेल्या सामाजिक व आर्थिक पाठबळाशिवाय राहणाऱ्या महिला, नैसर्गिक आपत्तीमध्ये बेघर झालेल्या महिला, कुटुंबाने आधार काढून घेतलेल्या निराधार, कौटुंबिक हिंसाचारात बळी पडलेल्या, अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या महिला व मुली, लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिला व मुली, तसेच १२ वर्षापर्यंतच्या मुलींना 'शक्ती सदन' येथे राहण्याची जास्तीत जास्त तीन वर्षासाठी राहण्याची परवानगी असते. त्यापुढे त्यांच्या परिस्थितीनुसार निर्णय घेण्यात येतो. ५५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या महिलांना पाच वर्षापर्यंत राहण्याची सोय असते त्यानंतर त्यांना वृद्धाश्रमात स्थलांतरीत केले जाते. स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने महिलांचे सहाय्य व पुनर्वसन शक्ती सदनच्या माध्यमातून करण्यात येते. राज्यात चंद्रपूर, बीड, अहिल्यानगर, धाराशिव, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, पालघर, लातूर, गडचिरोली, भंडारा, धाराशिव, नागपूर, मुंबई उपनगर (२), पुणे, अकोला, लातुर, सांगली, भंडारा, वाशिम तसेच अकोला या जिल्ह्यात २१ ठिकाणी 'शक्ती सदन' कार्यरत आहे. २२ राज्य महिला गृहे कार्यरत आहेत.

या योजनेअंतर्गत अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच, पिडीत महिलेला कायदेशीर सहाय्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत दिले जाते. आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपचारांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. 'वन स्टॉप सेंटर' या योजनेअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या समुपदेशकांमार्फत सदनातील महिला व मुलींना मनो-सामाजिक समुपदेशन व सेतू सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. ई-लर्निंग व खुल्या शाळा प्रणालीसाठी आवश्यक साहित्य पुरविण्यात येतात. कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या अंतर्गत रोजगार आणि प्रशिक्षण महासंचालनालय किंवा राष्ट्रीय कौशल्य विकास प्रशिक्षण परिषद यांचेकडे नोंदणीकृत संस्थामार्फत शक्ती सदनातील महिलांना व्यावसायिक तथा कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, शक्ती सदनातील महिलांच्या नावे बँक खाते सुरू करून ५०० रूपये एवढी रक्कम जमा करण्यात येते. सदनामधून बाहेर पडताना संबंधित महिलेस व्याजासह संपूर्ण रक्कम देण्यात येते.

मानवी तस्करी व देह विक्री व्यवसायास बळी पडलेल्या पिडितांच्या पुन:एकात्मिकरण व प्रत्यापर्णासाठी मानवी तस्करी विरोधी युनिट्सना शक्ती सदनामार्फत हाफ - वे होम अंतर्गत पिडीत महिलेला नोकरी करण्याची संधी देण्यात येते. जेणेकरून पिडितांना सदनातील जीवनापासून ते समाजातील स्वतंत्र जीवनामध्ये सहजपणे संक्रमण करता येईल. याचबरोबर पिडीत महिलेला मायदेशी पाठविण्यासाठी संपूर्ण जबाबदारी घेतली जाते. प्रत्येक शक्ती सदनात महिलांची कमाल क्षमता ही ५० इतकी आहे.

सक्षम पोर्टल -

सक्षम पोर्टल ही एक वेब बेस यंत्रणा आहे, या माध्यमातून राज्यातील महिला संरक्षणगृह, शक्तीसदन गृह यामध्ये दाखल होणाऱ्या पिडीत गरजू महिलांची बायोमेट्रिक नोंद घेण्यात येते. यामध्ये दाखल होणाऱ्या महिलांच्या बोटाचे ठसे तसेच फोटो घेतला जातो, महिलेची प्राथमिक माहिती, कौटुंबिक माहिती घेतली जाते. पिडीत महिला संरक्षणगृहातून बाहेर पडल्यावर सुद्धा नोंद घेण्यात येते. सर्व संरक्षणगृह एकमेकांना जोडली गेलेली असल्यामुळे सदर महिला इतर कोणत्याही गृहामध्ये पुनःप्रवेशित झाल्यास तिची माहिती ऑनलाईन दिसणार आहे.

ही योजना ७ डिसेंबर २०२३ पासून सुरु करण्यात आली असून, सध्या ६३०० महिलांची माहिती सक्षम पोर्टलवर नोंदविली गेलेली आहे. सुरवातीला ५-७ शासकीय महिला राज्यगृहांमध्ये ही योजना राबविण्यात आली नंतर टप्प्याटप्याने उर्वरित शासकीय महिला राज्यगृहांमध्ये राबविण्यात आली. एप्रिल २०२५ मध्ये केंद्र पुरस्कृत शक्तीसदन योजनेच्या संस्थांचा सुद्धा यात समावेश करण्यात आला. २८ जिल्ह्यातील ४३ संस्था सक्षम पोर्टलवर जोडल्या गेलेल्या आहेत, यामध्ये २१ शांती सदन, २२ महिला राज्यगृहांचा समावेश आहे. तसेच, १०० पेक्षा जास्त वापरकर्ते आहेत.


**श्रद्धा मेश्राम, विभागीय संपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,**

# चपाती की भात? जास्त फायदेशीर काय?



भात आणि चपाती या दोन्ही गोष्टींचा आपल्या रोजच्या जेवणात समावेश असतो. या दोन्हींमधून आपल्याला ऊर्जा मिळते. पण चपाती आणि भात यामधील आरोग्यासाठी अधिक चांगले काय? याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?

भात हे जगभरात सर्वाधिक खाल्ले जाणारे अन्न आहे. तर चपाती हा एक भारतीय ब्रेडचा प्रकार आहे. गव्हाच्या पिठापासून किंवा इतर धान्याच्या पिठापासून चपाती बनवता येते. याच प्रकारे तांदूळही विविध प्रकारांत उपलब्ध असतो. तर आता चपाती आणि भात यापैकी आरोग्यासाठी सर्वाधिक फायदेशीर काय? हे जाणून घेऊया.



भात आणि चपातीत कॅलरीजचं प्रमाण जवळपास सारखंच असतं, म्हणजेच दोन्ही खाल्ल्याने जवळपास समान कॅलरीज मिळतात. परंतु मधुमेही रुग्णांसाठी वजन नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करताना कॅलरीजवर जास्त लक्ष देणं गरजेचं असतं. त्यामुळे तुम्ही एका दिवसात किती कॅलरीज घेत आहात, हे पाहणं महत्त्वाचं ठरतं.

पोषणतज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, कार्बोहायड्रेट खाल्ल्याने वजन वाढत नाही. शरीरातील ऊर्जा टिकवून ठेवण्यासोबतच ते चरबीचं पचन करण्यास मदत करतात. सर्व प्रकारचे धान्य, ब्राऊन राईस आणि मसूर चरबी कमी करण्यासाठी उपयुक्त आहेत. आपल्या दैनंदिन आहारात कमीतकमी ६० टक्के कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट असले पाहिजे.

भात फायदेशीर की चपाती?

जर आपण चपाती आणि तांदळातील कार्ब्सबद्दल बोलायचं झालं तर तांदूळ पॉलिश करताना फायबर काढून टाकले जाते, यामुळे खराब कार्ब्सचे प्रमाण वाढते. त्यामुळे जास्त भात खाल्ल्याने शरीरातील इन्सुलिन वाढू शकते. त्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. तथापि, तांदळामध्ये असलेले अमाइलोपेक्टिन (अस्ब्ल्दजमूह) पचण्यास सोपे आहे आणि त्यामुळे ते बाळांसाठी एक चांगला पर्याय बनते.

त्याच वेळी, भातापेक्षा चपातीमध्ये अधिक पोषक तत्वं आढळतात. चपातीत फॉस्फरस आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात आढळतात. प्रोटिन्सच्या संख्येबद्दल बोलताना, दोन्हीमध्ये ते जवळजवळ समान प्रमाणात आढळतात.

या गोष्टींवर लक्ष द्या

रोटी आणि भात दोन्ही आरोग्यदायी आहेत. या दोन्हींमधून शरीराला ऊर्जा आणि आवश्यक पोषक तत्त्वं मिळतात. पण तुम्ही चपात्यांची संख्या आणि तांदळाचं प्रमाण लक्षात ठेवावं. अर्धा वाटी भात आणि चार चपात्या खाणं हा उत्तम पर्याय आहे. तांदळात ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असल्याने ते जास्त

# इतिहासात१२ सप्टेंबरचा दिवस

**अंतरराष्ट्रीय**

१८७८ – १८६ टन वजनाचा ३५०० वर्षे जना ओबेलिस्क ( वरती निमुळता होत गेलेला दगडी स्तंभ) अलेक्झांड्रियातून इंग्लंडला नेण्यात आला. तो लंडनला उभारण्यात आला. याला 'क्लिओपात्राज् निडल्' म्हणतात.त्याचा क्लिओपात्राशी कसलाही संबंध नाही.

१९४० – फ्रान्समध्ये लास्को या गुहांचा योगायोगाने शोध. या गुहांत आदिमानवाने चितारलेली रंगीत चित्रे असून, त्या गुहा आता जागतिक ठेवा मानल्या जातात.

१९४० – ब्रिटिश विमाने बटाटापिकावर विमानातून किडे टाकतात, असा दावा जर्मनीने केला.

१९४१ – रशियन आघाडीवर हिवाळ्याची सुरुवात. हा हिवाळा फारच भीषण होता. तो 'जनरल विंटर' या नावाने प्रसिद्ध आहे. या हिवाळ्यात थंडीने काकडून जेवढे जर्मन सैनिक मेले, तेवढे रशियांनानीही मारले नाहीत.

१९४२ – इटालियन युद्धकैद्यांना घेऊन निघालेले 'लॅकोनिया' हे जहाज जर्मनांनी बुडवले. त्यातील ८०० युद्धकैदी बुडून मेले. १००० युद्धकैदी वाचले.

१९४३ – ओट्टो स्कोर्झेनी या जर्मन कमांडोने अतिशय धाडसाने कैदेतल्या मुसोलिनीस पळवून नेले.

१९४४ – अमेरिकी सैन्य आखेनजवळ जर्मनीत शिरले.

१९४५ – अ‍ॅडमिरल माउंटबॅटनने जपानी सैन्याची शरणागती स्वीकारली.

**राष्ट्रीय**

१६८६ – औरंगजेबाने आदिलशाहीचा शेवट केला.

१७२७ – थोरल्या बाजीरावांनी निजामाविरुद्ध मोहीम सुरू केली.

१७८६ – लॉर्ड कॉर्नवॉलिस यांची भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक.


२००२ – भारताचा हवामान अभ्यास उपग्रह मेटसॅट प्रक्षेपित.

२००२ – भारतातील चिल्का सरोवराची आंतरराष्ट्रीय पर्यावरण पारितोषिकासाठी निवड.

२००३ – कुक्का पारे या अतिरेकीविरोधक विधानसभा सदस्याची काश्मीरमध्ये हत्या.

# तरच विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग सापडेल


नुकतेच इयत्ता दहावी-बारावीचे निकाल लागले. या वर्षी अनेक शाळांचे शंभर टक्के निकाल लागले आहेत. कोरोनानंतर खऱ्या अर्थाने यंदाची दहावी-बारावीची जी परीक्षा झाली, ती परीक्षा विद्यार्थांसाठी मोठे आव्हान होते. कारण त्यातून सावरत असताना अभ्यासाचे टेन्शन प्रत्येक विद्यार्थ्यावर होते. असे असताना भरपूर विद्यार्थी उत्तीर्ण झाले. काहींना अपयशही आले असेल. अपयश आले असले तरी खचून ज्याण्याचे काही कारण नाही. जीवनात यश आणि अपयश येतच असते. यश आले तरी पुढे जायचे आणि अपयश आले तरी पुढे जायचे, अशी खूणगाठ मनाशी बांधली पाहिजे. उलट अपयशातून बरेच काही शिकता येते, हे ध्यानात घेतले पाहिजे. त्यामुळे जिद्दीने पुढे जावे, असाच सल्ला द्यावासा वाटतो. खरे तर दहावी-बारावी परीक्षेचा टप्पा हा महत्त्वपूर्ण असतो. जीवन बदलाचा हा टप्पा असे त्याचे वर्णन केले तरी ते योग्य आहे. कारण या टप्प्यातून आपण पुढचे अभासक्रम निवडत असतो. शिवाय प्रत्येकाच्या आवडी-निवडी वेगवेगळ्या असतात. कुणाला कला, कुणाला वाणिज्य तर कुणाला विज्ञान विषयात गोडी, रुची असते. विषय कोणतेही असो आपण त्या त्या विषयाला कसा न्याय देतो, हे आपल्यावर अवलंबून आहे. असो. अनेकांनी या परीक्षेनंतर आपापल्या आवडीचे विषय निवडले असतीलच. या दोन्ही परीक्षा पास झाल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांची संभ्रमावस्था निर्माण होते. नेमका काय विषय निवडायचा जेणेकरून आपणास पुढे जाता येईल, असा प्रत्येकाच्या मनात विचार आलेला असतो. अशा वेळी मनाची घालमेल होते; परंतु शांतपणे विचार केला पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे विषय कोणताही असो आपण त्याला न्याय्य कसा देतो, हे आपल्यावर अवलंबून असते. म्हणजे झोकून देऊन, जिद्द, चिकाटी आणि मेहनत या गोष्टी लक्षात घेऊन पुढे गेले पाहिजे. आपली आवड कशात आहे, हे आधी ठरवले पाहिजे. पालकांनीही अमूकच विषय आपल्या पाल्ल्याने घेतला पाहिजे, असा आग्रह धरता कामा नये, तर त्याचा कल काय आहे, याची त्याला निवड करू दिली पाहिजे. म्हणजेच त्याच्यावर आपला विचार लादता कामा नये. पालक म्हणून त्याचा सांभाळ करणे, शिक्षण देणे, त्याच्या योग्य गरजा पूर्ण करणे एवढेच पालकांच्या हातात असते. शेवटी त्याला त्याचे पुढे जीवन जगावयाचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनीच अधिक सखोल आणि सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. कारण या टप्प्यामध्ये आपण योग्य निर्णय घेतला नाही, तर आपणावर भरकटण्याची पाळी आल्याशिवाय राहणार नाही, म्हणून सजग झाले पाहिजे. अर्थात सगळ्यांनाच परिस्थिती अनुकूल असतेच असे नाही.



अनेकांना प्रतिकूल परिस्थितीतून मार्गक्रमण करावे लागते. कुणाचे आई-वडील शेतात काम करतात, कुणी अल्प पगारावर नोकरी करून घर चालवत असतात. कुणी रिक्षा चालवून, कुणाची आई धुणी-भांडी करीत असेल, तर कुणी काय, कुणी काय आपला कामधंदा करून मुलाबाळांना शिकवत असतात. अशाही परिस्थितीत मुले-मुली जाणीव ठेवून शिक्षण घेतात आणि पुढे जातात. परीक्षांचे निकाल लागल्यानंतर वर्तमानपत्रांतून पुढे ज्या काही यशकथा प्रसिद्ध होतात, त्यावरून कोण कसा पास झाला, याचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहाते आणि ज्याने विचार केला नाही तोही गांभीर्याने विचार करू लागतो. यासाठीच योग्य विचार करण्याची गरज आहे. नुसतेच विचार करून चालणार नाही, तर त्याला कृतीचीही जोड द्यावी लागेल. म्हणून अशा वेळी तज्ज्ञांचा सल्ला महत्त्वाचा ठरतो. आपले करिअर आपण कसे घडवू शकतो, यासाठी विद्यार्थी आणि पालकांचे समुपदेशन करणे आवश्यक असते. सगळ्यात महत्त्वाची आहे ती आवड-निवड. याची आपल्या आवडीनुसार, कुवतीनुसार अभ्यासक्रम निवडला की त्यात गोडी निर्माण होते आणि त्याला न्याय देता येतो. नेमके हेच होत नाही. त्यामुळे मुलांना अपयश येते, नैराश्य येते आणि मग त्यातून नको ते विचार डोक्यात येतात. बरे ज्यांनी परीक्षेत भरपूर अगदी नव्वद टक्क्यांपेक्षा अधिक मार्क्स मिळवले, पुढे त्यांचे काय होते हेही माहीत पडत नाही. मार्क्स कमी मिळाले, जास्त मिळाले म्हणून मागेच राहील किंवा पुढे जाईल हेही सांगता येत नाही. कमी गुण मिळवणारे पुढे गेलेल्यांमध्ये अनेकजण आहेत. तर जास्त मार्क्स मिळवणारे मागे पडले, असेही होते. म्हणून आवडीनुसार अभ्यासक्रम निवडून योग्य मार्गदर्शन घेऊन पुढे जाणे हाच जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग आहे.

विद्यार्थ्यांना दहावीनंतर मोलाचे मार्गदर्शन ठरावे या दृष्टिकोनातून करिअर गाईडच्या माध्यमातून मार्गदर्शन नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचे कौतुक करताना विद्यार्थ्यांना हे मार्गदर्शन बोधामृत असल्याचे गौरवोद्गार पराग विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी बाळकृष्ण बनेशेठ यांनी या कार्यक्रमादरम्यान काढले असल्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची किती गरज आहे, हे प्रकर्षाने जाणवते.अशा प्रकारचा पहिला कार्यक्रम प्रहारफच्या मुंबई कार्यालयात नुकताच झाला. यामध्ये काही विद्यार्थी, पालक आणि त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशकांची उपस्थिती होती, तर दुसरा कार्यक्रम भांडुपच्या पराग विद्यालयात घेण्यात आला. यावेळी करिअर मार्गदर्शक सचिन सिंग यांनीही याबाबतच्या गरजेवर भर दिला. यशस्वी करिअरसाठी आत्मविश्वास महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने तो निर्माण करा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमाद्वारे मार्गदर्शन करताना दिला. परीक्षेत अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी करिअरमध्ये यशस्वी होतातच असे नाही, अशावेळी पालकांनी मुलांशी संवाद साधला तरच योग्य पद्धतीने पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. या दृष्टीने विद्यार्थ्यांनी विचार केल्यास त्यांना

## डॉक्टरांपासून दूर राहण्यासाठी — डॉक्टर टीप्स



पालकाची भाजी अशक्तपणा घालवते. त्यामुळे त्याचा आहारात समावेश करावा. यात कॅल्शियम, अ, ई आणि बी ९ जीवसत्त्व आणि बिटा केरॉटिन असतं. अर्धा कप उकळलेल्या पालकात ३.२ मिलिग्रॅम लोह मिळतं.

हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. उन्हाचं प्रमाण कमी मिळालं, तरच ड जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. या जीवनसत्त्वाचा डोस नियमितपणे मिळाला, तर हाडं आणि स्नायूंचं दुखणं कमी होतं.

## विनोद




अजय खेळून झाल्यावर विजयला म्हणाला, अरे माझी क्रिकेटची कॅप कुठे आहे? विजय म्हणाला, अरे, ती तर तुझ्या डोक्यावरच आहे तेव्हा अजय म्हणाला, अरे बरे झाले मला सांगितलेस ते नाही तर मी तिच्याशिवाय घरी गेलो असतो.

## संदेश

Latest New santa banta jokes 2019

SANTA- Aaj kal zyada bachche judwa kyo paida hote h?

BANTA- Desh me itna terrorist attacks badh gaya h ke bachche akele aane se darte

## सुविचार

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.

**- स्वामी विवेकानंद**




**संस्कृत सुभाषित**

**कस्य दोषः कुले नास्ति, व्याधिना कोन पीडितः। केन न व्यसनं प्राप्तं, श्रियः कस्य निरन्तरा ॥**

**अर्थ** - दोष कोणत्या कुळात नसतो? व्याधीमुळे कोणाला त्रास होत नाही? संकटे कोणावर येत नाहीत? आणि कोणाची संपत्ती टिकून राहते? सर्वांनाच या सर्वांशी तोंड द्यावे लागते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. नमस्काराचा एकल शब्द
५. अत्यंत कृश माणूस
९. अपशकुन
१०. धाक
११. धनको
१२. कोलकाताचे विमानतळ
१३. दटावणी, धमकावणे
१५. चमक, मुरगळा
१७. राष्ट्र
१८. कलंक, बट्टा
२०. अशिलाची बाजू मांडणारा
२१. शर्यतीत धावणारे गोष्टीतील दोन प्राणी
२३. प्रचंड
२६. श्रेष्ठ पुरुष
२८. कणीदार
२९. कुंतीचे पुत्र
३०. दूर करणारा
३२. दुर्दशा
३३. बगीचा
३४. निकट, जवळ
३६. चांदी
३७. 'तर'च्या बरोबरच्या शब्द
३८. माणूस
३९. पुष्कळ
४०. च्या साठी
४२. जन्माचे प्रमाणपत्र
४३. बिनवासाचे पांढरे फूल
४४. डुक्कर
४६. सामान
४८. जात, जातीतील पोटभाग
५०. समशेर
५३. शिंपला, एक छोटी समुद्री प्राणी
५४. प्रश्न
५७. उत्तराधिकारी
५८. मदतनीस
५९. एक मंगल वाद्य
६१. गाव, नगर
६५. मगज
६७. माणूस
६९. ताप येण्यापूर्वीचे शहारे
७०. संगीतातील ठेका
७१. भटक्या गोसावी
७४. धर्मार्थ देणे
७५. अधाशी
७६. च्या देखत, समक्ष
७७. पालखी, मेणा
७८. पदार्थाचा सूक्ष्म भाग

## उभे शब्द

१. राजमहाल
२. करपलेले पीक
३. जाणे-येणे, वहिवाट
४. युद्ध
५. गावप्रमुखाचे कार्य
६. महाराणा प्रतापचा घोड्याचे नाव
७. तात्काळ, ताबडतोब
८. दारूचा एक प्रकार
९. पंजाबातही प्रसिद्ध मराठी संत
११. औषध
१४. मुले-बाळे असलेला
१६. हालचाल
१९. हत्ती
२१. सूट, वाढीव मुदत
२२. स्त्रियांचा पंजाबी पोशाख
२४. भरभराट
२५. सैन्याचा विभाग
२७. चुका करत करत
२९. उपकार
३१. मातीचा कण
३२. अवाजवी
३३. पोते
३५. तृण
३७. जनन
३८. रेलचेल, विपुलता
३९. वनवास
४१. वर-वधूची मिरवणूक
४५. मिठाई तयार करणारा
४७. श्रीरामाची जुळे मुले
४९. नशा आणणारा, कैफी
५१. घाव, प्रहार
५२. जिव्हा
५३. कारखान्याचा मालक
५५. बारीक सारीक
५६. गुजराथी नृत्यप्रकार
६०. मऊ
६२. शिव! शिव!
६३. आवड, रुची
६४. सैन्याची तुकडी
६६. चांदणी
६८. अरण्य
७०. तारणारा
७२. धातुचा धागा
७३. चामखीळ

## आडवे उत्तर

१.रामराम ५.पाप्याचे पितर
९.नाट १०.जरब ११.दमदाटी
१२.डमडम १३.तालेवार १५.लचक
१७.देश १८.डाग २०.वकील
२१.ससा कासव २३.जबरदस्त
२६.नरवर २८.रवाळ २९.पांडव
३०.निवारक ३२.अवकळा ३३.बाग
३४.लगत ३६.रजत ३७.जर ३८.मानव
३९.अनेक ४०.स्तव ४२.जन्मदाखला
४३.तगर ४४.वराह ४६.माल
४८.जमात ५०.तलवार ५३.कालव
५४.सवाल ५७.वारसदार
५८.सहाय्यक ५९.सनई ६१.शहर
६५.गर ६७.मानव ६९.रसकस ७०.ताल
७१.रमताराम ७४.दान ७५.हावरट
७६.समोर ७७.नरवाहन ७८.कण

## उभे उत्तर

१.राजवाडा २.मर ३.राबता
४.समर ५.पाटीलकी ६.चेतक
७.तडकसार ८.रम ९.नामदेव
११.दवा १४.लेकुरवाळा
१६.चलनवलन
१९.गज २१.सवलत
२२.सलवार कमीज २४.बरकत २५.दळ
२७.चुकतमाकत
२९.पांग ३१.रज ३२.अवास्तव
३३.बारदान ३५.गवत ३७.जन्म
३८.मालामाल ३९.अरण्यवास
४१.वरात ४५.हलवाई ४७.लवकुश
४९.मादक ५१.वार ५२.रसना
५३.कारखानदार ५५.लहानसहान
५६.रासगरबा ६०.नरम ६२.हरहर
६३.रस ६४.पलटण ६६.तारा ६८.वन
७०.तारक ७२.तार ७३.मस




# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### राऊतांनी शिंदेंचं नाव घेत सांगितले मॅच खेळवण्याचे कारण





मुंबई -''अबुधाबीला भारत-पाक सामना खेळवला जातोय हे लोकभावनेच्या विरुद्ध आहे,'' अशी टीका उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना राऊत यांनी सध्या सुरु असलेल्या आशिया चषक स्पर्धेतील सामन्याबद्दल वेगळीच शंका उपस्थित केली आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना राऊत यांनी भारत-पाकिस्तान सामना खेळण्याच्या निर्णयावरुन आक्षेप घेतला आहे. खून आणि क्रिकेट एक साथ कसं?''२६ निरपराध लोक पहलगाम येथे मारले गेले त्यांच्या कुटूंबाचा आक्रोश अजूनही पाहतोय. ऑपरेशन सिंदूर सुरु आहे असा म्हणताय. पाकिस्तानचं कंबरडं मोडू असा पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री म्हणाले. खून आणि पाणी एक साथ नहीं बहेगा असा ते म्हणाले आणि आता खून आणि क्रिकेट एक साथ कसं?'' असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. ''विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांचा याबद्दल म्हणणं काय आहे ते सांगावं?'' असा सवालही राऊतांनी विचारला आहे.

'माझं कुंकू, माझा देश' आंदोलन-सामन्याच्या दिवशी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून आंदोलन केलं जाणार आहे. ''आमची महिला आघाडी १४ तारखेला सामन्याच्या दिवशी रस्त्यावर उतरेल व याचा निषेध करेल. 'माझं कुंकू, माझा देश' असं आंदोलन केलं जाईल. 'सिंदूर के सन्मान मे, शिवसेना मैदान मे' असं आंदोलन असणार आहे,'' अशी माहितीही राऊतांनी दिली. ''आंदोलनकर्त्या या महिला मोदींना सिंदूर पाठवतील. हे अभियान सुद्धा आम्ही राबवणार,'' असं राऊतांनी सांगितलं.

हा एक प्रकारे देशद्रोह-भारत-पाकिस्तान सामन्याचा निषेध ठाकरेंच्या शिवसेनेकडून केला जाणार आहे. ''या मॅच चा निषेध आमचा पक्ष करेल. हा एक प्रकारे देशद्रोह आहे. भाजपच्या नेत्याची पोरं अबूधाबीला मॅच बघायला जातील,'' असा टोला राऊतांनी लगावला आहे.

बाळासाहेबांचा उल्लेख करत शिंदे सेनेवर हल्लाबोल

''भारत पाक सामना होणार नाही असा बाळासाहेब म्हणाले होते. ज्यांनी मैदान उखडलं ते सुद्धा शिंदे गटात आहेत.

## जखमी कर्णधार, घाबरलेला पाकिस्तान! भारताविरुद्ध खेळण्याआधी धक्का

दिल्ली,-आशिया कप २०२५ सुरू होण्यापूर्वी पाकिस्तानला दुखापतीची चिंता लागली आहे. बुधवारी दुबईतील आयसीसी अकादमीमध्ये झालेल्या बहुतेक सराव सत्रांमध्ये संघाचा कर्णधार सलमान आगा सहभागी झाला नाही. सलमानच्या मानेला ताण आल्याचे सांगण्यात येत आहे, ज्यामुळे त्याला मानेला पट्टी बांधावी लागली.

सराव सत्रात नेमकं काय घडलं?

सलमान संघासोबत सराव सत्रांसाठी गेला असला तरी, तो वॉर्म-अप आणि फुटबॉल ड्रिलपासून दूर राहिला, तर उर्वरित खेळाडूंनी पूर्ण फिटनेस रूटीन केले. त्याच्या मर्यादित हालचाली पाहून संघ व्यवस्थापनात काही चिंता निर्माण झाली, विशेषत: रविवारी भारताविरुद्ध हाय-व्होल्टेज सामना होणार असताना.

पीसीबीने स्पष्ट केले की 'घाबरण्याची गरज नाही, पण...'

दरम्यान, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) ही दुखापत गंभीर असल्याचे म्हटले नाही आणि म्हटले आहे की, ही फक्त एक सावधगिरीची उपाययोजना होती. पीसीबीच्या मते, सलमानची दुखापत किरकोळ आहे आणि तो लवकरच पूर्ण सरावात परतेल. कर्णधार आशिया कपच्या महत्त्वाच्या सामन्यांसाठी तंदुरुस्त होईल असा संघ व्यवस्थापनाला विश्वास आहे.



संघाची फलंदाजी आगावर अवलंबून...

सलमान आगा सध्या पाकिस्तान क्रिकेट संघाच्या नवीन युगाचे नेतृत्व करत आहे. बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान सारख्या वरिष्ठ खेळाडूंच्या जाण्यानंतर, संघाची कमान आता सलमानकडे सोपवण्यात आली आहे. प्रशिक्षक माइक हेसन यांच्या नेतृत्वाखाली हा संघ पुन्हा एकदा स्वत:ला स्थापित करत आहे. आगा आणि फखर जमान हे या संघाचे सर्वात अनुभवी फलंदाज आहेत.

सलमानने मंगळवार ९ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत म्हटले होते की, 'आम्ही चांगले क्रिकेट खेळत आहोत आणि गेल्या काही महिन्यांपासून संघ एकजुटीने कामगिरी करत आहे. सर्व खेळाडू या स्पर्धेबद्दल उत्साहित आहेत.' या दरम्यान, त्याने भारतीय संघाबद्दलही विधान केले. भारत आशिया कपचा फेव्हरिट आहे का असे विचारले असता, सलमानने स्पष्टपणे सांगितले की टी-२० क्रिकेटमध्ये कोणताही संघ फेव्हरिट नाही. सामन्याचा मार्ग फक्त एक किंवा दोन षटकांत बदलू शकतो.

पाकिस्तान संघ त्रिकोणी मालिका जिंकल्यानंतर आला...

आशिया कपपूर्वी यूएईमध्ये झालेल्या त्रिकोणी मालिकेत पाकिस्तान संघाने अफगाणिस्तानला ७५ धावांनी हरवून विजेतेपद जिंकले. या विजयामुळे संघाचा आत्मविश्वास वाढला आहे. आता २०२५ च्या आशिया कपमध्ये पाकिस्तानला ग्रुप स्टेजमध्ये भारत, यूएई आणि ओमानचा सामना करावा लागणार आहे. सलमान संघाचा नेता आणि फॉर्ममध्ये असलेला अष्टपैलू खेळाडू असल्याने या मोहिमेत त्याची तंदुरुस्ती खूप महत्त्वाची ठरेल.

## भारत-पाक सामना तरीही रिकामे तिकीट काउंटर!

नवी दिल्ली -आशिया कप २०२५ मधील भारत विरुद्ध पाकिस्तान हा हायव्होल्टेज सामना १४ सप्टेंबरला खेळला जाणार आहे. दोन्ही देशांमधील क्रिकेट युद्ध म्हणजे नेहमीच फुल्ल हाऊस स्टेडियम, पण यंदा चित्र अगदी उलट आहे. अजूनही या सामन्याची सर्व तिकीटं विकली गेलेली नाहीत आणि हेच सगळ्यांच्या चर्चेचा विषय ठरत आहे.का विकली जात नाहीयेत तिकिटं?

मिळालेल्या माहितीनुसार, आयोजकांनी तिकीटांचे दर एवढे वाढवले आहेत की सामान्य प्रेक्षक मागे सरकत आहेत. काही पोर्टल्सवर पाहिलं तर %घ्ङ एल्गू एरू या श्रेणीतील तिकिटांचा दर दोन सीट्ससाठी तब्बल २.५ लाखांपर्यंत गेला आहे. यात अनलिमिटेड जेवणं-पेय, %घ्ङ क्लब-लाउंज प्रवेश, खास एंट्रन्स आणि पार्किंग पाससारख्या सुविधा दिल्या जात आहेत. याशिवाय, रॉयल बॉक्स सुमारे २.३ लाख, स्काय बॉक्स १.६



चाहत्यांची नाराजी

नेहमी भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटं काही तासांत हाऊसफुल्ल होतात, पण या वेळेस दरांच्या झळेमुळे विक्री थंडावली आहे. सोशल मीडियावर अनेक चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे ''तिकिटांचे दर आकाशाला भिडलेत, मग सामान्य फॅन्सनी स्टेडियममध्ये जाऊन सामना कसा पाहायचा?'' असा सवाल केला जात आहे.

विशेष सामन्याचं ऐतिहासिक महत्त्व

गेल्या अनेक वर्षात भारत-पाक यांच्यात द्विपक्षीय मालिका झा-लेली नाही. अशा परिस्थितीत एशिया कप आणि घ्ण टूर्नामेंट्स हेच मोठं व्यासपीठ ठरतं. त्यामुळे हा सामना कितीही महाग असला तरी त्याचं वेगळं आकर्षण कायम राहणार आहे.

## शुभमन गिलची दोन शब्दांची पोस्ट व्हायरल



नवी दिल्ली -आशिया कप २०२५ मध्ये टीम इंडियाने दमदार सुरुवात करत यूएईवर ९ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. कुलदीप यादवच्या फिरकीसमोर यूएईचे फलंदाज गुडघे टेकले. या शानदार विजयानंतर उपकर्णधार शुभमन गिलने सोशल मीडियावर फक्त दोन शब्दांची पोस्ट टाकली आणि त्यावरून फॅन्समध्ये प्रचंड चर्चा रंगली आहे.

१० सप्टेंबरला दुबईत झालेल्या सामन्यात यूएईने प्रथम फलंदाजी करताना १३.१ षटकांत अवघ्या ५७ धावांवर गडी गमावले. कुलदीप यादवने एका ओव्हरमध्ये ३ विकेट्स घेत यूएईचा मधला फळी मोडीत काढला, तर शिवम दुबेनंही तुफानी गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराहच्या यॉर्करने सामना भारताच्या बाजूला झुकला.लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने आक्रमक सुरुवात केली. ओपनर अभिषेक शर्माने पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकला आणि फक्त १६ चेंडूत ३० धावा झळकावल्या. त्याच्या खेळीमध्ये ३ षटकार आणि २ चौकार होते. तो लवकर बाद झाला, मात्र त्यानंतर शुभमन गिल आणि सूर्यकुमार याद-वने आरामात विजय मिळवून दिला. गिल २० धावांवर नाबाद राहिला आणि विजयी चौकार ठोकला, तर सूर्या ७ धावांवर नाबाद राहिला. भारताने अवघ्या ४.३ षटकांत हे लक्ष्य गाठलं.

सामना संपल्यानंतर शुभमन गिलने एक्स (पूर्वीचं ट्विटर) वर फक्त दोन शब्द लिहिले मफग़ूज ध्हाफ्फ़ म्हणजेच भारताने आशिया कप जिंकण्याच्या मोहिमेतील पहिले पाऊल भक्कमपणे टाकले आहे, असा संकेत त्याने दिला.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ सप्टेंबर रोजी होणार आहे. गिलचा हा पोस्ट पाहून चाहत्यांमध्ये उत्सुकता आणखी वाढली आहे आणि फॅन्सना आता भारत-पाक लढतीची आतुरता लागली आहे.

## सलामीवीर अभिषेक शर्माची तुफानी फलंदाजी पहिल्याच बॉलवर सिक्सर...

दुबई,-दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आशिया कप २०२५ च्या पहिल्या सामन्यात टीम इंडियानं इतिहास रचला. कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं यजमान यूएईला फक्त ५७ धावांत गुंडाळलं आणि नंतर ४.३ षटकांत लक्ष्य गाठून ९ विकेट्सनं दमदार विजय मिळवला.या विजयातील सर्वात खास गोष्ट म्हणजे तरुण सलामीवीर अभिषेक शर्माची तुफानी फलंदाजी, ज्यानं धावांचा पाठलाग करताना पहिल्याच चेंडूवर षटकार मारला आणि भारतीय क्रिकेटमध्ये एक अनोखा विक्रम केला. म्हणजेच धावांचा पाठलाग करताना अभिषेक टी-२० मध्ये पहिल्याच चेंडूवर षटकार मारणारा पहिलाच खेळाडू ठरला.

अभिषेक शर्माचा विक्रम काय : अभिषेक शर्मानं यूएईविरुद्ध १६ चेंडूत ३० धावा केल्या, ज्यामध्ये ३ षटकार आणि २ चौकारांचा समावेश होता. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पहिल्याच चेंडूवर षटकार मारुन धावांचा पाठलाग सुरु करणारा तो भारताचा पहिलाच फलंदाज ठरला. डावाच्या पहिल्या चेंडूवर षटकार मारणाऱ्या तीन भारतीय फलंदाजांची नावं आधीच नोंदलेली आहेत, पण या सर्व



सलामीवीरांमध्ये धावांचा पाठलाग करताना पहिल्या चेंडूवर अशी कामगिरी करणारा अभिषेक शर्मा पहिलाच खेळाडू ठरला.

पहिल्या चेंडूवर षटकार मारणारे भारतीय खेळाडू :

रोहित शर्मा- विरुद्ध आदिल रशीद (इंग्लंड), अहमदाबाद, २०२१

यशस्वी जैस्वाल- विरुद्ध सिकंदर रझा (झिम्बाब्वे), हरारे, २०२४

संजू सॅमसन- विरुद्ध जोफ्रा आर्चर (इंग्लंड), मुंबई, २०२५

अभिषेक शर्मा- विरुद्ध हैदर अली (युएई), दुबई, २०२५

भारताच्या गोलंदाजांचा बोलबाला : या सामन्यात नाणेफेक जिंकल्यानंतर भारतानं प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना यूएई संघ फक्त ५७ धावांवर ऑलआउट झाला. कुलदीप यादवनं ४ बळी आणि शिवम दुबेनं ३ बळी घेतले. प्रत्युत्तरात भारतीय संघानं फक्त २७ चेंडूत या धावसंख्येचा पाठलाग केला. टीम इंडियानं आशिया कप मोहिमेची सुरुवात वर्चस्वानं केली आहे. अशा सहज विजयामुळं खेळाडूंचा आत्मविश्वास आणखी वाढेल. विशेषत: रविवारी (१४ सप्टेंबर) पाकिस्तानविरुद्धच्या हाय-व्होल्टेज सामन्यापूर्वी, हा विजय संघाचं मनोबल वाढवेल.

## ३ विकेट काढताच शिवम दुबेचा कॉन्फिडेन्स वाढला, हार्दिक पांड्याबाबत हे काय बोलून गेला? क्रिकेट वर्तुळात चर्चा

मुंबई -टीम इंडियाने आशिया कप स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात युएईला ९ विकेटने धुळ चारली आहे. टीम इंडियासमोर ५८ धावांचे लक्ष्य होते. हे लक्ष्य टीम इंडियाच्या सलामीविरांनी अवघ्या ४.३ ओव्हरमध्ये गाठत सहज विजय मिळवला आहे. या विजयात ऑलराऊंडर शिवम दुबेने ३ विकेट घेऊन मोलाची भूमिका बजावली होती.त्यामुळे सामन्यानंतर बोलताना शिवम दुबेने एक ही विकेट न घेणाऱ्या हार्दिक पांड्याबाबत मोठे विधान केले होते.

खरं तर टीम इंडियाकडून कुलदीप यादवने ४,शिवम दुबेने ३, जसप्रीत बुमराह,अक्षर पटेल आणि वरूण चक्रवर्तीने प्रत्येकी १ विकेट घेतली होती. टीम इंडियात तीन ऑलराऊंडर खेळाडू होते.एक हार्दिक पांड्या, अक्षर पटेल आणि शिवम दुबे. त्यातल्या त्यात पांड्या आणि दुबे वेगवान गोलंदाजी करतात. पण आजच्या सामन्यात पांड्याला एकही विकेट घेता आली नाही.याऊलट दुबेला तीन विकेट मिळाली होती.त्यामुळे तीन विकेट घेऊन त्याचा कॉन्फिडेन्स भलताच वाढला होता.

यावेळी सामना संपल्यानंतर माध्यमांशी बोलताना शिवम दुबे म्हणला, ''हार्दिक पंड्या माझ्या भावासारखा आहे - त्याच्याशी माझी तुलना नाही. मी नेहमीच त्याच्या सल्ल्या आणि अंतर्दृष्टीतून शिकत



राहतो, असे त्याने म्हटले.त्याच्या या विधानाची आता चर्चा रंगली आहे.

कसा रंगला सामना ?

टीम इंडियाचा कर्णधार सुर्यकुमार यादवने टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे युएई प्रथम फलंदाजीसाठी उतरली होती.युएईच्या सलामीवीरांनी चांगली सूरूवात केली होती. अलिशान शराफूने १७ बॉलमध्ये २२ धावा ठोकल्या होत्या. त्यानंतर मुहम्मद वसीमने १९ धावा केल्या होत्या. या दोन्ही खेळाडूंचे विकेट पडल्यानंतर इतर ८ खेळाडू एकेरी धावसंख्येवर बाद झाले होते.अशाप्रकारे युएई १३ ओव्हर १ बॉलमध्ये ५७ धावांवर ऑल आऊट झाली होती.

टीम इंडीयाच्या गोलंदाजांनी या सामन्यात उत्कृष्ट गोलंदाजी केली होती. टीम इंडियाकडून कुलदीप यादवने ४,शिवम दुबेने ३, जसप्रीत बुमराह,अक्षर पटेल आणि वरूण चक्रवर्तीने प्रत्येकी १ विकेट घेतली होती.

टीम इंडियासमोर ५८ धावांचे लक्ष्य होते.या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने ४.३ ओव्हरमध्ये हे आव्हान पुर्ण केले होते. टीम इंडियाकडून अभिषेक शर्माने ३० धावा केल्या होत्या.त्याच्यासोबत शुभमन गिल २० आणि सुर्यकुमार यादव ७ वर नाबाद राहिला.अशाप्रकारे भारताने ९ विकेट राखून हा सामना जिंकला.

भारताची प्लेइंग इलेव्हन : अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, संजू सॅमसन (विकेटकिपर), शिवम दुबे, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती

संयुक्त अरब अमिराती (प्लेइंग इलेव्हन): मुहम्मद वसीम (कर्णधार), अलिशान शराफू, मुहम्मद जोहैब, राहुल चोप्रा (विकेटकिपर), आसिफ खान, हर्षित कौशिक, हैदर अली, ध्रुव पराशर, मुहम्मद रोहीद खान, जुनैद सिद्दिकी, सिमरनजीत सिंग

## भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट नकार

नवी दिल्ली -येत्या १४ सप्टेंबरला दुबईमध्ये होणाऱ्या भारत-पाकिस्तान टी-२० क्रिकेट सामन्यावर बंदी घालावी, यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाने सुनावणी करण्यास नकार दिला आहे. ''सामना होऊ द्या. आम्ही कोणतीही बंदी घालणार नाही,'' असे कोर्टाने स्पष्टपणे सांगितले आहे.

चार एलएलबी (कायद्याच्या) विद्यार्थिनींनी, उर्वशी जैन यांच्या नेतृत्वाखाली याबाबत याचिका दाखल केली होती. त्यांनी याचिकेत पहलगाम येथील अतिरेकी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरचा संदर्भ देत पाकिस्तानविरुद्ध सामना खेळणे राष्ट्रीय भावना आणि प्रतिष्ठेचा अपमान असल्याचे म्हटले होते.

गुरुवारी (११ सप्टेंबर २०२५) कोर्टात तातडीच्या सुनावणीसाठी अर्ज करण्यात आला होता. भारत-पाकिस्तान सामना १४ सप्टेंबरला दुबई इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. हे प्रकरण न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर मांडण्यात आले.

कोर्टात काय घडलं?

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी कोर्टास विनंती केली की, ''सामना रविवारचा असल्याने, याचिका शुक्रवारपर्यंत यादीत घ्यावी''. मात्र, कोर्टाने स्पष्टपणे सांगितले की, ''सामना रोखण्याचा आमचा कोणताही विचार नाही.'' पुन्हा विनंती केल्यानंतरही कोर्टाने सुनावणी घेण्यास नकार दिला आहे.

याचिकेतील मुद्दे काय होते?

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट हे मैत्री आणि सलोख्याचं प्रतीक असतं, पण अलीकडील पहलगाम अतिरेकी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर अशा देशाशी सामना खेळणे, ज्याने अतिरेकींना आसरा दिला आहे, हे चुकीचा संदेश देणारे आहे. जेव्हा आपले सैनिक देशासाठी बलिदान देत आहेत, तेव्हा आपण अशा देशासोबत सामना खेळून उत्सव साजरा करतो, हे योग्य नाही. पाकिस्तानी अतिरेकी हल्ल्यात प्राण गमावलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांच्या



भावना दुखावल्या जाऊ शकतात. राष्ट्राची प्रतिष्ठा आणि नागरिकांचा सुरक्षा हेच सर्वोच्च प्राधान्य असायला हवं, केवळ करमणूक नव्हे, असे याचिकेत म्हटले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करण्यास नकार दिला आहे.

सामना ठरल्याप्रमाणेच होणार

१४ सप्टेंबरला दुबईमध्ये होणारा भारत-पाकिस्तान टी-२० एशिया कप क्रिकेट सामना नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे या सामन्यावर कोणताही कायदेशीर अडथळा उरलेला नसल्याचे दिसून येत आहे.

भारत-पाक सामन्यावरून राऊतांची भाजपवर टीका

संजय राऊत यांनी म्हटले होते की, शिवसेनेची महिला आघाडी १४ तारखेला रस्त्यावर उतरणार आहे. 'माझं कुंकू-माझा देश' असा आंदोलन केलं जाईल. ''सिंदूर के सन्मान मै, शिवसेना मैदान मै' असे आंदोलन असणार आहे. मोदींना महिला सिंदूर पाठवतील. ते अभियान सुद्धा आम्ही राबवणार आहोत. या मॅचचा निषेध आमचा पक्ष करेल. हा एक प्रकारे देशद्रोहच आहे. भाजपच्या नेत्यांची पोरं अबुधाबीला मॅच बघायला जातील. जय शाह तर क्रिकेटचे सर्वेसर्वा आहेत. अमित शाह आम्हाला राष्ट्रभक्तीच्या गोष्टी शिकवतात.

आम्ही मूळ विचारापासून दूर गेलो, असे म्हणतात. आम्ही मूळ विचारापासून दूर गेलेलो नाही. तुम्हाला लाजा वाटत नाही का? अरे तुम्ही तुमचे तोंड तरी उघडा. विरोध तरी करा. तुम्ही हिंदुत्ववादी आहात ना, असे म्हणत त्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला होता.

नवनाथ बन यांचा संजय राऊतांवर पलटवार

भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी पत्रकार परिषदेत संजय राऊतांवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, ''राऊतांनी 'माझे कुंकू माझा देश' अभियानाची घोषणा केली आहे. पण देशप्रेमाचे हे ढोंग करणे योग्य नाही. कारण जेव्हा लोकसभा निवडणुका होत्या तेव्हा त्यांच्या मिरवणुकांमध्ये पाकिस्तानचे झेंडे फडकले, हिरवे गुलाल उधळले गेले, दहशतवादी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेले लोक त्यांच्या प्रचारासाठी आले - तेव्हा देश आठवला नाही. आज मात्र क्रिकेट सामन्यावरून अचानक देशप्रेम आठवतेय. त्यामुळे तुम्हाला 'माझे कुंकू माझा देश' नव्हे तर 'मझा जावेद, माझी बिर्याणी' असे अभियान चालवावे लागेल,'' अशी टीका नवनाथ बन यांनी संजय राऊत यांच्यावर केलीय.

## नशेत जन्मदात्या मुलाने आईचाच घेतला जीव; कणकवली तालुक्यातील घटनेने सर्वत्र हळहळ

सिंधुदुर्ग : दारूची नशेमुळे कधी कधी आपल्याला जन्मदाती माताही नकोशी होते, याचे उत्तम उदाहरण कणकवली येथे घडले असून, दारूच्या नशेमध्ये मुलानेच चक्क आपल्या आईचा खून केल्याची घटना वारगाव सोरफ-सुतारवाडी येथे बुधवारी रात्रीच्या घरी घडली. या घटनेत आई प्रभावती रामचंद्र सोरफ (८०) हिचा जागीच मृत्यू झाला असून, याबाबत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मुलगा रवींद्र रामचंद्र सोरफ (४५) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर आईचा खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया कणकवली पोलीस ठाण्यात सुरू केली आहे. मुलाला दारूच्या नशेत आपली आईच क्रूर असल्याची वाटू लागली आणि त्याचाच प्रत्यय खुनात झाला. संशयित आरोपी रवींद्र याला दारूचे व्यसन आहे. सोरफ कुटुंबीय वारगांव सोरफ-सुतारवाडी येथील एका घरात राहत असून, या घरामध्ये पाच बिऱ्हाडे आहेत. बुधवारी रात्रीच्या सुमारास प्रभावती आणि मुलगा रवींद्र यांच्यात काही कारणावरून वाद झाले. त्यातून संतप्त झालेल्या रवींद्रने आईची हत्या केली.

# 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून तब्बल ७.४ लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्री गणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्य सेवेचा लाभ पोहोचला.

राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान तब्बल १२,६५५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून तब्बल ७ लाख ४०७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आढळलेल्या १८,८०० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून २३६ शिबिरांतून एकूण १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.

**२८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियानातून :**

एकूण आरोग्य शिबिरे : १२,६५५
एकूण लाभार्थी रुग्ण : ७,०४,०७३
एकूण पुरुष लाभार्थी : ३,१३,५०८
एकूण महिला लाभार्थी : ३,०५,०३४
लहान बालक लाभार्थी : ८५,५०८
संदर्भित रुग्ण (पुढील उपचारासाठी पाठवलेले) : १८,८००
एकूण रक्तदान शिबिरे : २३६
एकूण रक्तदाते : १६,७९८

महाराष्ट्रातील तब्बल ७.०४ लाख नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला, तर १६,७९८ दात्यांनी रक्तदान करून समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**जिल्हानिहाय सर्वाधिक योगदान**

सर्वाधिक शिबिरे : पुणे - २५२५
सर्वाधिक रुग्ण तपासणी : पुणे - १,६५,७१८
सर्वाधिक संदर्भित रुग्ण : पुणे - ३,६१३
सर्वाधिक रक्तसंकलन : कोल्हापूर - ४,५०४
बालकांचा सर्वाधिक सहभाग : पुणे - २०,७८१

## १६,७९८ नागरिकांनी केले रक्तदान

**गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. 'श्री गणेशा आरोग्याचा' उपक्रमातून तब्बल ७.४ लाखांहून अधिक नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करता आली. तपासणीदरम्यान आढळलेल्या १८,८०० रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत.**

**- श्री. रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महाराष्ट्र**

# स्वसंरक्षणाबरोबरच डिजिटल संरक्षण महत्त्वाचे

## सहाय्यक पोलीस इन्स्पेक्टर सुप्रिया केंद्रे यांचे प्रतिपादन

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील युवती कल्याण मंडळाचे उद्घाटन



**लातूर/प्रतिनिधी :** युवकांनी सोशल मीडियाचा कमी वापर करून करिअरकडे लक्ष द्यावे आणि आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे. जगात वावरत असताना शारीरिक,मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या सुदृढ असणे गरजेचे आहे.महाविद्यालयीन युवक व युवतीनी क्रिकेट,बॅडमिंटन,पोहणे,योगासने यासारखे छंद जोपासत योगासन,चांगल्या सवयी अंगीकारले पाहिजे. जीवनात आलेल्या प्रत्येक समस्यांवर मात करीत स्वावलंबी बनले पाहिजे,असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस इन्स्पेक्टर सुप्रिया केंद्रे यांनी केले. येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी युवती कल्याण मंडळ २०२५-२६ चे उद्घाटन झाले.या निमित्ताने सेल्फ डिफेन्स अनलॉक युअर डिफेन्स पॉवर या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.बेल्लाळे तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून सहाय्यक असिस्टंट पोलीस इन्स्पेक्टर सुप्रिया केंद्रे,तसेच आयक्यूएसी समन्वयक डॉ. जे.ए.अंगुलवार,युवती कल्याण मंडळ समन्वयक प्रा.शितल पाटील,प्रा.चौधरी ए.आर.,डॉ. टी.एच.मुजावर, प्रा.ए.आर अंधारे,प्रा.एन.एन.शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एस.डी पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन युवती कल्याण मंडळाचे प्रेसिडेंट कांचन बलवाड यांनी केले. सूत्रसंचालन गोरड प्रिया आणि प्रतीक्षा लांडे यांनी संयुक्तरीत्या केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय शितल चव्हाण यांनी करून दिले.याप्रसंगी प्रा.मेघा आत्राम,डॉ.रामशेट्टी शेटकार,युवती कल्याण मंडळाचे अध्यक्ष कांचन बलवाड उपाध्यक्ष काझी मोमीन, सचिव गोरड प्रिया, सहसचिव शंके सानिका, ट्रेझर जाधव निकिता, जॉईंट ट्रेझरर चव्हाण शितल कांबळे श्रेया, प्रतीक्षा लांडे,शिंदे अंजली,सुरवसे सुहानी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि महिला शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्वच्छता ही सेवा अभियान १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर दरम्यान जिल्हाभर - मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना

**लातूर/प्रतिनिधी :** स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रायल यांच्यातर्फे संपूर्ण देशात १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' हे अभियान राबविण्यात येणार आहे.अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी दिली.

१५ सप्टेंबर रोजी या जनजागृती आभियानाला सुरुवात होईल.

जनतेत स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी. सर्वांना स्वच्छतेची शपथ देऊन 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत स्वच्छ आरोग्यपूर्ण आणि नवीन भारताच्या निर्मितीसाठी पूर्ण निष्ठेने आपला परिसर, कार्यालय, सार्वजनिक स्थळी स्वच्छता ठेवण्याचा तसेच स्वच्छतेची आवड अधिकाधिक प्रसारीत करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा सर्वांनी संकल्प करावा, असे ही ते म्हणाले.

'स्वच्छता ही सेवा' अभियान दि. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या राबवायचे आहे. त्या दृष्टिने जिल्हा परिषदेंतर्गत सर्व कार्यालये, शाळा, गावांमधील परिसर स्वच्छ सोयींयुक्त करण्यासाठी या अभियानात प्रत्येकाने सक्रीयरित्या सहभागी होण्याचे आवाहन राहुल कुमार मीना यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व गावे स्वच्छ सुंदर करण्याच्या दृष्टीने या अभियानांतर्गत ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामविकास अधिकारी, गटसमन्वयक,समुहसमन्वय, आरोग्य सेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, रोजगार सेवक हे संवादक म्हणून गावातील लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायती सदस्य, सरपंच, विद्यार्थी, पालक यांच्याशी संवाद साधून स्वच्छतेचे महत्व पटवून देत, या अभियानात घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात सर्वांना उत्स्फूर्तपणे सहभागी करुन घेणार आहे. तसेच गाव आणि तालुका पातळीवर स्वच्छता मेळाव्याचे आयोजन, शौचालयाचा शंभर टक्के वापर करणाऱ्या ग्रामपंचायतीतील सरपंच, सदस्य, ग्रामसेवक, गांवकरी यांचा सन्मान करण्यात करण्यात येणार आहे. गृहभेटी अंतर्गत आंतरव्यक्ती संवादातून उदबोधन, शौचालय वापर , ग्रामस्तरीय वातावरण निर्मितीसाठी ग्रामसभा, कलापथक, चित्रपट, शालेय विद्यार्थ्यांची स्वच्छता फेरी, श्रमदान, गावातील सार्वजनिक शौचालये, बसस्थानक, बाजाराची ठिकाणे, पिण्याच्या पाण्याची टाकी, पाण्याचा स्त्रोतांचा परिसराची स्वच्छता करण्यात येणार आहे. जनजागृतीवर प्रामुख्याने भर देऊन शालेय स्वच्छता दुत, पाणी व स्वच्छता या विषयांवर वकृत्व, निबंध, चित्रकला, रांगोळी स्पर्धा इत्यादी स्पर्धा या विविध उपक्रमांचे आयोजन जिल्हा या अभियानांतर्गत करण्यात येणार आहेत.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव (उपचिटणीस शाखा)

मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdclosmanabad@gmail.com

जा.क्र २०२४/उपचिटणीस/एमएजी-५/कावि- ६४/ सिआर- ०३ दिनांक :- /०८/२०२५

### जाहिर प्रगटन
### ( विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे बावी ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, बाबी ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर १३७४ मध्ये श्री. मंगेश रघुनाथ जावळे रा. खामकरवाडी ता. वाशी यांनी शोभेची दारू तयार (फटाका निर्मिती) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

१. पूर्व बाजू - शिवाजी विठोबा जावळे
२. पश्चिम बाजू - बाळासाहेव विठोबा जावळे
३. दक्षिण बाजू - रंजीत रघुनाथ जावळे
४. उत्तर बाजू - नवनाथ विठोवा जावळे

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशी, मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव / कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव / कार्यकारी दंडाधिकारी, वाशी / कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, महाराष्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्ड, छत्रपती संभाजीनगर, सह संचालक औदयोगिक सुरक्षा व आरोग्य नांदेड यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, श्री. मंगेश रघुनाथ जावळे रा. मौजे. खामकरवाडी ता. वाशी यांना मौजे. बावी ता. वाशी येथील जमीन गट नंबर १३७४ मध्ये शोभेची दारु तयार करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई -१ ची परवानगी देणेबाबत कोणास कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले पासून (०८) दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**(शोभा जाधव)**
**अपर जिल्हादंडाधिकारी धाराशिव**

**जिमाका/एके/जाहि/६०/२०२५-२६**

# दयानंद शिक्षण संस्थेनी माजी विद्यार्थीनी विधी पळसापुरेचा केला सत्कार

## महाराष्ट्र शासनाच्या सुधारित युवा धोरण समितीवर विधी पळसापूरची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सुधारित युवा धोरण समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी माजी विद्यार्थीनी विधी सुभाष पळसापुरेचा दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते तिच्या पालकांसहित यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे बालकिशन बांगड,दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व डॉ.कोमल गोमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी विधी पळसापुरे ही दयानंद विज्ञान महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी असून तिने इयत्ता अकरावी ते पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विज्ञान महाविद्यालयातच घेतले.आज तिची महाराष्ट्र शासनाच्या सुधारित युवा धोरण समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड होणे ही बाब दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालयासाठी निश्चितच आनंददायी बाब आहे.याशिवाय विधीने लातूरचे नावलौकिक वाढविले,ही प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बाब आहे,असेही ते म्हणाले.

याचबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालयातही महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनीही विधी पळसापुरेचा तिच्या पालकांसहित सन्मान केला.यावेळी प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,दयानंद विज्ञान महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी विधी पळसापुरे हिने विद्यार्थी दशेपासूनच संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकाविले आहे.शिक्षण घेत असतानाच तिच्यामध्ये नेतृत्व गुण होता.वाचन,लेखन व अभिव्यक्ती कौशल्य तिच्या ठिकाणी आहे.साहित्य,संगीत,कला,विज्ञान,काव्यवाचन,वक्तृत्व,वादविवाद अशा विविधांगी स्पर्धेत आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाने तिने आपला ठसा सर्व क्षेत्रात उमटविलेला आहे.विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीतही तिने बाजी मारलेली आहे.मलेशिया येथे झालेल्या स्पर्धेमध्ये १६० देशांपैकी तिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिकही विद्यार्थी दशेमध्येच मिळविले.दयानंद विज्ञान महाविद्यालयात तिने काही काळ कामही केले.ती आज युवा धोरण समितीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे,युवकांचे प्रतिनिधित्व करणार आहे,ही निश्चितच आमच्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.युवा संसदेत तिने केलेले भाषण अतिशय उत्कृष्ट होते.विधीने संस्थेचे,महाविद्यालयाचे व लातूरचे नावलौकिक असेच जागतिक पटलावर आणखी झळकावावे,असेही ते म्हणाले.

याप्रसंगी विधी पळसापुरे असे म्हणाली की,दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक नेहमी प्रोत्साहित करतात.महाराष्ट्र शासनाच्या सुधारित युवा धोरण समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड होणे ही माझ्यासाठी निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. जबाबदारीचे ओझे माझ्या खांद्यावर आलेले आहे.महाराष्ट्रातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी समितीच्या माध्यमातून मी भरीव असे कार्य करणार आहे.युवकांचे प्रतिनिधित्व करण्याची मला संधी मिळालेली आहे.भारत हा युवकांचा देश असून युवकांनी राजकारण,संशोधन क्षेत्र अशा प्रत्येक क्षेत्रात पुढे यायला पाहिजे.महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील युवकांचे प्रश्न व समस्या सोडवण्यावर माझा भर असणार आहे.युवकांना जास्तीत- जास्त संधी उपलब्ध करून देणे ही आजच्या आधुनिक काळाची खरी गरज आहे,असेही ती म्हणाली.

महाविद्यालयातील कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले.याप्रसंगी उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,डॉ. चंद्रशेखर स्वामी,डॉ.आण्णाराव चौगुले,डॉ. रोहिणी शिंदे,डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ. राहुल मोरे,प्रा.मेघा पंडित,ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,डॉ.गजानन बने,डॉ.टी. एच.मुजावर,डॉ.रामशेट्टी शेटकार यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.त्यांनीही तिचे अभिनंदन व कौतुक केले.


**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**



शाखा १. जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २. जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# औसा तालुक्यात उद्योजकता परिचय मेळावा संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील उद्गा येथे उद्योजकता परिचय मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे आयोजन महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त संस्था एमसीईडी तसेच अमृत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या मेळाव्यास प्रकल्प अधिकारी श्री.दीपक गायकवाड व अमृत संस्था मॅनेजर श्री.शुभम मुळजकर हे प्रमुख उपस्थित होते.

मेळाव्याच्या सुरुवातीला उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. ग्रामीण भागातील युवक-युवतींना उद्योग व व्यवसाय क्षेत्राकडे वळवणे, त्यांना आत्मनिर्भर बनवणे व शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता.

प्रकल्प अधिकारी श्री. दीपक गायकवाड यांनी आपल्या भाषणात अमृत लक्षित गटातील युवक-युवतींना उद्योजकतेकडे वळण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, ग्रामीण पातळीवर अनेक उद्योग संधी उपलब्ध असून, योग्य मार्गदर्शन घेतल्यास युवक-युवती स्वतःचा उद्योग उभारू शकतात. यामुळे फक्त वैयक्तिक प्रगतीच नव्हे तर समाज आणि गावाच्या विकासालाही चालना मिळेल. गायकवाड यांनी विशेषतः अमृत लक्षित गटातील नव्या पिढीने उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, शासकीय अनुदानित योजना समजून घ्याव्यात व स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

यानंतर श्री. शुभम मुळजकर यांनी अमृत संस्थेतर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी व्याज परतावा योजना तसेच इतर सवलतींचा कसा लाभ घेता येईल हे समजावून सांगितले. मुळजकर यांनी स्पष्ट केले की, अमृत संस्था केवळ कर्जपुरवठा न करता उद्योगाला टिकविण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आहे. यामुळे लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींवर मात करून दीर्घकाळ उद्योग चालविणे शक्य होते.

मेळाव्यात सहभागी झालेल्या युवक-युवतींनी विविध शंका उपस्थित केल्या. या शंकांचे निरसन गायकवाड व मुळजकर यांनी करताना प्रत्यक्ष उदाहरणांसह मार्गदर्शन दिले. विशेष म्हणजे, उपस्थित तरुणांनी या कार्यक्रमात दाखविलेली उत्सुकता पाहता गावात उद्योजकतेचे नवे पर्व सुरू होण्याची चिन्हे दिसून आली.

या मेळाव्यातून ग्रामीण पातळीवरील युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या दालनांची माहिती मिळाली. उद्योजकतेतून रोजगार निर्मिती, आर्थिक स्वावलंबन व सामाजिक प्रगती साध्य होऊ शकते हा महत्त्वपूर्ण संदेश या मेळाव्यातून अधोरेखित झाला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून मेळाव्याची सांगता करण्यात आली. गावातील अनेक युवक-युवतींनी अशा प्रकारच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## सोने आणि हिरे दागिन्यांच्या खरेदीवर मिळणार आर्थिक दिलासा; पीएनजी ज्वेलर्सतर्फे प्युअर प्राइस ऑफर मोहिम







**लातूर/प्रतिनिधी :** आगामी लग्नसराई आणि उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पीएनजी ज्वेलर्सने प्युअर प्राइस ऑफर मोहिम सुरू केली असून १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. ही योजना आगामी सण व लग्नसराईच्या हंगामात ग्राहकांना सोने खरेदी करताना लातूरकरांना आर्थिक दिलासा देण्यासाठी खास तयार करण्यात आली आहे.

सोन्याच्या किंमतीत सतत होणाऱ्या वाढीचा विचार करता या योजनेत ग्राहकांना त्यांच्या आवडीचे सोनं किंवा हीऱ्यांचे दागिने १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विद्यमान दराने प्री-बुक करण्याची संधी मिळते जर नंतर सोन्याचा दर वाढला, तरीही त्यांना आधीच्या कमी दराचा लाभ मिळतो. आणि जर दर कमी झाला, तर पीएनजी ज्वेलर्स बिलिंगवेळी कमी झालेला दर मान्य करून ग्राहकांना दिलासा देणार आहे.

या मोहिमेबाबत पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, भारतीय कुटुंबांसाठी सोनं ही केवळ गुंतवणूक नसून भावनिक आणि सांस्कृतिक दृष्टीनेही महत्त्वाची गोष्ट आहे. प्युअर प्राइस ऑफर च्या माध्यमातून आम्हाला ग्राहकांना पारदर्शक, निश्चित आणि फायद्याचा खरेदी अनुभव द्यायचा आहे. हीच ग्राहक आणि पीएनजी ज्वेलर्समधील विश्वासाची जोडणी आहे. प्युअर प्राइस ऑफर चा लाभ पीएनजी ज्वेलर्सच्या महाराष्ट्रातील सर्व दालनांमध्ये घेता येणार आहे.

## कर्मयोगी जमदाडे संस्थेचे कार्यनिष्ठ शिक्षक आणि सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर



**लातूर/प्रतिनिधी :** कर्मयोगी ड. देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर यांच्या वतीने गेल्या सहा वर्षापासून कोणताही प्रस्ताव न मागवता आपल्या क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार आणि सामाजिक कृतज्ञता पुरस्कारासाठी केली जाते. २०२५ च्या पुरस्कारांची घोषणा संयोजक डॉ.संजय जमदाडे आणि निवड समितीचे प्रमुख डॉ. राजशेखर सोलापुरे यांनी केली.

कर्मयोगी ड. देविदासराव जमदाडे राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार - २०२५ साठी राज्यातील अकरा शिक्षक व प्राध्यापकांची निवड करण्यात आली आहे दिले. त्यात डॉ. बालासाहेब किलचे (पैठण), डॉ. महेश जाधव (परभणी), डॉ. शोभा हनवते (छत्रपती संभाजीनगर), डॉ. जितेंद्र पुल्ले (पूर्णा), दीपक शिंदे (सांगोला), अनंत कदम (उदगीर), विवेक कोरे (तुळजापूर), श्रीमती सुनीता सदाशिव पोटे (लातूर), नंदू खंडागळे (भोक्रंबा), संगिता सौदागर (लातूर), नाजेमा शेख ,(लातूर) यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

तर कर्मयोगी ॲड. देविदासराव जमदाडे सामाजिक कृतज्ञता पुरस्कारासाठी हत्तीबेट विकासासाठी कार्य करणारे व्ही.एस. कुलकर्णी (उदगीर), सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद बाहेती (निलंगा), आरोग्यविषयक प्रबोधन करणारे संजय राजुळे (लातूर), सामाजिक जबाबदारी पार पाडणारे रुद्र प्रतिष्ठान (लातूर) यांची निवड करण्यात आली आहे.

सदरील पुरस्कारांचे वितरण लवकरच मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ.संजय जमदाडे आणि निवड समितीचे प्रमुख डॉ. राजशेखर सोलापुरे यांनी दिली आहे.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत स्वा.रा.ती.म. विद्यापीठाची पॉवर लिफ्टिंग स्पर्धा उत्साहात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मुलांची अ-विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. वाजिद चाऊस होते. उद्घाटनप्रसंगी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील क्रीडा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. कैलास पाळणे, विद्यापीठाचे सिनेट सदस्य मा. डॉ. महेश बेंबडे तसेच क्रीडा अभ्यास मंडळ सदस्य मा. डॉ. भास्कर रेड्डी उपस्थित होते. दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयांमध्ये करण्यात येते. यामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली ताकद व कौशल्य प्रदर्शित करतात. विजयी विद्यार्थी पुढील विभागीय स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतात. समारोप प्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभागी होऊन आपल्या अंगी असलेल्या क्रीडाकौशल्याचा विकास करावा, असे आवाहन केले.

## तिरंगी क्रिकेट स्पर्धेत सुरज इलेव्हनचा शानदार विजय!



**लातूर/प्रतिनिधी :** मैत्री क्रिकेट क्लब आयोजित तिरंगी क्रिकेट स्पर्धा दयानंद मैदानावर ०४ सप्टेंबर ते १२ सप्टेंबरदरम्यान दिमाखात पार पडली. या थरारक मालिकेत सुरज इलेव्हन संघाने दमदार खेळ करत विजेतेपद पटकावले, तर बालाजी इलेव्हन संघ उपविजेता ठरला. श्रीकांत इलेव्हन संघानेही चुरशीची लढत देत प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धेतील रोमांचक क्षणांनी मैदानात प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चौकार-षटकारांचा पाऊस आणि गोलंदाजांच्या अचूक चेंडूंनी उपस्थित क्रिकेटप्रेमींना टाळ्यांचा वर्षाव करायला भाग पाडले.

सिरीज मधील उत्कृष्ट प्रदर्शने:
मालिकावीर - अकबर चौधरी
सामनावीर - बालाजी भोसले
उत्कृष्ट गोलंदाज - गफ्फार भाई शेख
उत्कृष्ट फलंदाज - बालाजी भोसले
उत्कृष्ट क्षेत्ररक्षक - वाजीद भाई सय्यद
उत्कृष्ट झेल - अशपाक सय्यद

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभाला मैत्री क्रिकेट क्लबचे मान्यवर व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी तसेच वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली.

या यशस्वी स्पर्धेमुळे लातूर शहरातील क्रिकेटप्रेमींना अविस्मरणीय अनुभव मिळाला. तरुणाईत वाढत्या क्रिकेटप्रेमाचा आणि खेळाडूंच्या जिद्दीचा प्रत्यय मैदानावर सर्वत्र दिसून आला.

### भरधाव कारची धडक; एक जण जखमी

**लातूर/प्रतिनिधी :** चाकूर शहराच्या पश्चिमेस निळ्या रंगाच्या भरधाव वेगातील एका कारने फिर्यादी चालवत असलेल्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याची घटना १० सप्टेंबर रोजी घडली. निष्काळजीपणे भरधाव वेगात कार चालवून धडक दिल्याने फिर्यादी अब्दुल जब्बार अब्दुल सत्तार पठाण, (रा. गाझीपुरा, लातूर) गंभीर जखमी झाले आहेत.

### अनुदान ..

अनुदान केले जमा
खचितउचित नावा
एक खात्यात येता
कळे अख्ख्यागावा

उठू लागे आरोळ्या
चला बँकेकडे धावा
प्रवाह वाहे जोरदार
वल्हवू लागतीनावा

आहोत आम्ही पात्र
शिस्तीत केला दावा
लाडकीभगिनी खुश
धन्यवाद तुला भावा

पात्रता ठरवली वैध
शांतता लाभो जीवा
भाजूनघ्यावी भाकर
तापलेला आहे तवा

वादळेशमू लागलीयं
उल्हसितझाली हवा
उपरे सारले बाजूला
गिळत होते जे खवा

ज्याचाहक्काचाघास
त्याचा त्यानेचं खावा
घुसखोरांवर कारवाई
कडक शब्दांत सुनवा

भली अंमलबजावणी
योजना अशीचं बनवा
चांगल्या कामाकरिता
पैशांची नसते वानवा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा क्र.: SUR/L/T/2024/43R**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता,सामान्य, मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रसिद्ध, अनुभवी आणि लायसन्सधर विद्युत ठेकेदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाईन ई-निविदा मागवित आहे.**कामाचे नाव:** वाडी स्थानकावर ८ टाइप-२ आणि १ टाइप-३ निवासी क्वार्टर,शाहाबाद स्थानकावर ६ टाइप-२ निवासी क्वार्टर,सोलापूर विभाग अंतर्गत विद्युत सामान्य सेवा काम. **अनुमानित खर्च:** रु. २१,८६,०४२.१२/- **बोली सुरक्षा:** रु. ४३,७००/- **काम पूर्ण करण्याची कालावधी:** १२ महिने **ऑफरची वैधता:** ६० दिवस **निविदा बंद होण्याची दिनांक व वेळ:** ०६.१०.२०२५ रोजी १५:०० वाजताबोली सुरक्षा रक्कम **www.ireps.gov.in** वर ई-पेमेंटद्वारे भरावी. 60
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/20**
सीनियर डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनिअर (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/20 **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील टर्नआउट आणि क्रॉसओव्हर ठिकाणी १०५ चौरस मिमी जंपरच्या जागी १६० चौरस मिमी जंपरची तरतूद करून जक्र् चे अपग्रेडेशन. **अंदाजे खर्च:** रु. २,०९,९३,८८६/- **बोली सुरक्षा:** रु. २,५५,०००/- **काम पूर्णता कालावधी:** १२ महिने, **ऑफरची वैधता:** ६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** ०३.१०.२०२५ रोजी १५:०० वाजता. 59
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना क्रमांक.**
**SUR-C-TG-25-20 आणि SUR-MPS-2025-3**
सोलापूर विभागातील A1, A.B आणि D.E. श्रेणीतील स्थानकांवर केटरिंग स्टॉल्स (MPS आणि चहाचे स्टॉल्स) चालवण्यासाठी पाच वर्षांच्या कालावधीसाठी कराराच्या वाटपासाठी ई-लिलावासाठी ०८.०९.२०२५ आणि ०९.०९.२०२५ च्या निविदा सूचना येथे जोडाल्या आहेत. **(१) लिलाव कॅटलॉग क्रमांक:** SUR-C-TG-25-20 **लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ:** प्रारंभ-दुपारी १२.०० वा. २४.०९.२०२५ बंद-दुपारी १२.४० वा. २४.०९.२०२५ **स्थानकांचे नाव:** खालील स्थानकांवर चहाच्या स्टॉल्सचा ई-लिलाव. **१.** बार्शी शहर **२.** धाराशिव **(२) लिलाव कॅटलॉग क्रमांक:** SUR-MPS-2025-3 **लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ:** प्रारंभ-दुपारी १२.०० वा. २३.०९.२०२५ बंद-दुपारी १२.३० वा. २३.०९.२०२५ **स्थानकांचे नाव:** सोलापूर स्थानकावरील एमपीएस स्टॉलचा ई-लिलाव. **पद्धत:** ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) **निविदेचा कालावधी:** वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी १०% वाढीसह ५ वर्षे. **वेबसाइट पत्ता:** सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल **http://www.ireps.gov.in/** वर उपलब्ध आहेत. सहभागींनी अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती आहे. 61
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 01 | Work of Providing & fixing Maintenance free earthing pits, renovation of existing earthing pits & risers connection at 132kV Latur (Koyna) S/s, 132kV Ujani S/s and 132kV Renapur S/s Under EHV (O&M) Division Latur. | EE/EHV/O&M/LTR/TS/2025-26/T-08 | 7000037593 |

For further details, visit our Website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The ADEE (O) Phone No. +918956304921.
The DYEE (O) Phone No. +918554995271.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**(Mr. Aftab Khan)**
**Executive Engineer,**
**EHV (O&M) Division Latur**

**जाहीर सूचना**
**लातूर जिल्ह्यातील ताडी दुकानांचा जाहीर ई-लिलाव**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, लातूर जिल्ह्यातील (१०) ताडी दुकानांचा जाहीर लिलाव (ई-लिलाव-नि-निविदा) (E Tender Cum Action) प्रणालीद्वारे Online पद्धतीने दि.२९.०९.२०२५ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येणार आहे.

संबंधितांना कळविण्यात येते की, सदर जाहीर ई-लिलावाच्या अटी/शर्ती/व प्रकियेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, रूम नं. ४ लातूर व सर्व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. नमूद ई-लिलावात भाग घेवून इच्छिणाऱ्या सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**(के.जी.राऊत)**
**अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर**

स्वाक्षरित/-
**(वर्षा ठाकूर-घुगे) भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, लातूर**

विमाका/लातूर/जाहि क्र.५९/२०२५-२०२६

**निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र**
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

**टोनर रिफिलिंग**



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६